# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक


३ ● सृष्टीक्रम की संवर्धन ? (जनुकीय संशोधन)

७ ● रचनात्मक शिक्षण

१२ ● चीन व दक्षिण कोरियातील बेकारी

१५ ● विनोद आणि बुद्धिविकास

१७ ● लसीकरण व प्रदूषण

१९ ● जागतिक व्यापार संघटना व शेती

२३ ● शेती व माहिती-तंत्रज्ञान

२६ ● सेंद्रिय शेती : आवाहन व आव्हाने

२८ ● शांततेच्या पाऊलखुणा (फिरता प्रवासी)

३२ ● जगाच्या पाठीवर.....

३५ ● कालप्रवाहात.....



खंड २ : अंक ५ ऑगस्ट २००३

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी ?
## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे "अर्थबोधपत्रिका" हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ◆अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठविणे अत्यावश्यक आहे. ◆अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणी १००रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $२०) डिमांड ड्राफ्ट / मनीऑर्डर / पोस्टल ऑर्डर / चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावे** पाठवावी. त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.

**अर्थबोधपत्रिका : खंड २ (अंक ५ ) : ऑगस्ट २००३**

**संपादक** - रमेश पानसे, **संपादन साहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक / व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२ ई-मेल : ispe@vsnl.com
: ५६५७२१० फॅक्स : ५६५७६९७

# संपादकीय

अलीकडे झालेल्या संगणक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे, अनेक शास्त्रांमध्ये संशोधनाचा वेग वाढला आहे. विशेषतः फोटो इमेजिंगच्या तंत्रामुळे मानवी मेंदूच्या आतील प्रक्रियांचा शोध घेणे बऱ्यापैकी शक्य झाले आहे. त्याच्या सहाय्याने मज्जाशास्त्र, मज्जामानसशास्त्र, बालमानसशास्त्र अशा शास्त्रांमधून नवे विचारप्रवाह येऊलागले आहेत. यातून माणसाच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर काही नवा प्रकाश पडू लागला आहे. त्याच्या आधारे शिक्षणशास्त्रात परिवर्तन होऊलागले आहे. रचनात्मक शिक्षणप्रक्रियेला आता बळकट शास्त्रीय आधार प्राप्त होऊ लागला आहे. या संदर्भातील या अंकातील लेख तसेच जनुकीय संशोधनाविषयीचा लेख हे अशा तऱ्हेच्या बदलत्या विचारप्रवाहांचा मागोवा घेणारे लेख आहेत. विनोद आणि बुद्धिविकास यांचा संबंध सांगणारा लेखही या गटात पडू शकेल.

आर्थिक विषयांवरील अनेक लेख अर्थबोधपत्रिकेत नेहमीच प्रसिद्ध होत असतात. या अंकात शेतीच्या संदर्भातील, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतील चर्चासत्रातील सेंद्रीय शेतीचा लेख, माहितीतंत्रज्ञानाशी निगडित असलेला लेख आणि जागतिक व्यापार संघटनेच्या येत्या सभेतील शेती विषयक चर्चिले जातील असे प्रश्न, हे लेख देण्यात आले आहेत. चीन व दक्षिण कोरियातील बेकारीचा प्रश्न मांडणारा लेखही वाचकांना काही नवी माहिती देईल.

जगात एकीकडे संघर्ष-युद्धे यांचे वाढते ढग असतानाच, ढगांना केवळ रूपेरी कडा देतील इतपत प्रभाव पाडणारे शांतता निर्मितीचे प्रयत्नही शोधून सापडतात. रॉजर प्लंक यांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर सामंजस्य निर्माण करणारा, शांततेच्या दिशेने, अशांत नेत्यांच्या विचारांना वळण देऊपाहणारा प्रयत्न वाचकांना निश्चितच प्रभावित करील.

या अंकातच अर्थबोधपत्रिकेच्या दिवाळी अंकाची सूचना (पान २ पाहावे) देण्यात आली आहे; वाचकांना विनंतीही करण्यात आली आहे. वाचकांचा अर्थबोधपत्रिकेच्या व्यवहारवृद्धीत हातभार अपेक्षित आहे. आम्ही वाचकांच्या प्रतिसादाबाबत आशा धरून आहोत.

■■

## वाचकांचा प्रतिसाद

अर्थबोधपत्रिकेचे जानेवारी-फेब्रुवारी आणि मे महिन्याचे अंक नुकतेच वाचनात आले. इतके दिवस मराठी दैनिकात, नियतकालिकांत असणारी कमतरता अर्थबोधपत्रिका भरून काढत असल्याबद्दल आनंद झाला. राज्यपातळीवर प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकात अर्थविषयक बातम्या व लेख असतात. पण त्यातील बहुतांशी बातम्या अंकाला मिळणाऱ्या जाहिरातींशी संबंधित असतात. जिल्हापातळीवरून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकात अर्थसंकल्पाच्या बातमीशिवाय वर्षातून कधीतरीच आर्थिक क्षेत्राला ठळक महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत अर्थबोधपत्रिका आर्थिक क्षेत्रातील घडामोडींची देत असलेली माहिती अतिशय महत्त्वाची ठरते. विशेषत: मराठी वाचकांसाठी तर ही बाब अधिकच महत्त्वाची आहे. अर्थबोधपत्रिकेत, भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या कृषीक्षेत्राशी निगडित लेख प्रसिद्ध व्हावेत अशी अपेक्षा आहे.

रवींद्र राऊत, पाचगाव, कोल्हापूर

जून २००३ च्या अंकात शेवटी पुरवणी म्हणून वि.म. दांडेकर यांचा `गोमाता की गोधन' हा लेख दिला आहे. त्यात गोमूत्र, गाईचे शेण यांचा उपयोग व त्यातून आर्थिक उत्पन्न यांचा उल्लेख नाही. कृपया एकता मासिक, पुणे, जून २००३ चा अंक

*(पान क्रमांक २७वर पाहावे)*


### वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा मागील वर्षीचा दिवाळी अंक `संस्कृती विशेषांक' होता. या वर्षीचा दिवाळी अंक ?

`आशियातील शेजारी राष्ट्रांची समाजस्थिती'

आपण आपल्या एका तरी परिचिताला. मित्र-मैत्रिण वा नातेवाईकांना अर्थबोधपत्रिकेची वर्गणी भरून दिवाळीची वैचारिक भेट द्या. त्यांना वार्षिक वर्गणीतच दिवाळी अंक ऐन दिवाळीत मिळेल. कितीजणांना अशी भेट आपण द्याल ? या भेट अंकांवर आम्ही, आपल्या नावे शुभेच्छा अंक, असे त्यांना कळवूच. शिवाय आपल्या या वर्गणीदारांना (पहिल्या पन्नास) आम्हीही भेट म्हणून मागील वर्षीचा संस्कृती विशेषांक पाठवू. इतर प्रत्येकाला पूर्वीचा एखादा अंक भेट म्हणून पाठवू.

**`भेट-वर्गणी' साठी अंतिम तारीख २० सप्टेंबर २००३**

# सृष्टीक्रम की संवर्धन

माणसाचं माणूस म्हणून घडणं हे कितपत माणसाच्या हातात असतं? कितपत ते निसर्गाधीन असतं? माणसाचं शरीर, त्याचं मन, त्याच्या बुद्धिमत्ता हे सारं निसर्गाचं देणं असतं की त्यात मानवी कर्तृत्वाचा, आजूबाजूच्या मानवी वातावरणाचा वाटा असतो, याविषयीचा वाद कित्येक वर्षे अखंड चालू आहे. प्रकृती म्हणजे सृष्टीक्रम (नेचर) की संस्कृती म्हणजे संवर्धन (नर्चर), असा हा वाद जनुक शास्त्रज्ञांमध्ये हिरीरीने घातला जातो आणि प्रत्येक नव्या संशोधित ज्ञानाबरोबर पुन:पुन्हा रंगतोही.

या वादाचा इतिहास तसा मोठा आहे. माणसाचा स्वभाव निसर्गत:च ठरलेला असतो की तो तसा विविध परिणामांतून बनतो याविषयींची चर्चा तेवीसशे वर्षांपूर्वीचे ग्रीक तत्वज्ञ प्लॅटो आणि ॲरिस्टॉटल यांनीही केली आहे. रुसो किंवा कांट यांचे मत असे होते की माणसाच्या बाबतीत अपरिवर्तनीय स्वभाव अशी काही गोष्ट खासच अस्तित्वात आहे. जॉन लॉक नि डेव्हिड ह्यूम यांनी मात्र, माणसाचा स्वभाव, प्राप्त अनुभवांतून घडत असतो, असे म्हटले आहे. परंतु नेचर की नर्चर याविषयीची अलीकडची शास्त्राधारित चर्चा सुरू केली ती मात्र १८७४ साली, गणितज्ञ फ्रॅन्सिस गाल्टन याने. (डार्विनचा हा नातेबंधू, बुद्धीमापनाच्या कसोट्यांचा शोध घेणारा म्हणूनही आपल्याला माहीत आहे.) गाल्टनचे म्हणणे असे होते की माणसाचे व्यक्तिमत्व हे उपजत असते, ते अनुभवांनी घडवलेले नसते. (नेचर आणि नर्चर या अनुप्रासयुक्त शब्दजोडीचा वापरही त्यानेच यासंदर्भात पहिल्यांदा केला. अर्थात, हे शब्द शेक्सपियरकडून उचललेले होते, आणि त्याने ते शाळाशिक्षक रिचर्ड मुलकास्टर यांच्याकडून ! ) गाल्टन यांनी माणसाच्या उपजत क्षमतांवर भर देऊन सुप्रजननशास्त्राला (युजिनिक्स) आपला पाठिंबा दर्शविला. (युजिन्किस हा संज्ञाशोधही गाल्टन यांचाच ) मात्र याचा व्यवहारात झालेला परिणाम फार गंभीर होता. सुप्रजननशास्त्राची संकल्पना नाझींनी फार उत्साहाने स्वीकारली. कारण, त्याद्वारे त्यांच्या वांशिक कत्तलींना समर्थन मिळाले होते. परिणामत: पुढे कित्येक वर्षे ही भूमिका त्याज्य मानली जात होती.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात, या वादाचा लोलक निसर्गाच्या बाजूने झुकला होता. पण त्याला छेद दिला तो मात्र तीन मोठ्या मानसतज्ज्ञांनी. जॉन वॅटसन यांनी मानवी शिकण्याला प्राधान्य दिले आहे. इवान पॉवलो यांच्या प्रयोगाचे विश्लेषण करून त्याच्या आधारे, हे आपले ठाम मत त्यांनी मांडले आहे. सिगमंड फ्राईड यांनी, लहान मुलांच्या मनांवर आई-वडिलांचा नि लहान वयात मिळणाऱ्या

अनुभवांचा परिणाम कसा होतो ते दाखवून दिले आहे. फ्रॅन्झ बोआस यांनी तर अगदी ठामपणे विधान केले आहे. त्यांच्या मते, वांशिक फरक जे आढळतात त्यांची कारणे इतिहासात, अनुभव नि परिस्थितीत असतात; ती शरीरविज्ञान किंवा मानसशास्त्रात नसतात.

नेचर-नर्चर या वादात पुन्हा एकदा, क्षमतांच्या नैसर्गिकतेला प्रभावी रीतीने पुढे आणले आहे ते भाषाशास्त्रज्ञ नोम चॉम्स्की यांनी. १९५८ साली वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ स्किनर याच्या पुस्तकावरील परीक्षणात, त्यांच्या विचारांवर आक्षेप घेताना, चॉम्स्की यांनी अशी स्पष्टता केली की माणसाला केवळ यत्न-प्रमाद पद्धतीने भाषा शिकणे कठीण आहे. कोणत्याही भाषिक प्रदेशातील मूल त्या त्या भाषांचे व्याकरण अगदी अल्पावधीत आणि सहजपणे आत्मसात करू शकते, याचे कारण, त्याच्या उपजत नैसर्गिक क्षमतांमध्ये आहे. व्याकरणाची कौशल्ये मूल जन्माला येतानाच घेऊन येत असते, असे चॉम्स्की यांचे प्रतिपादन आहे. या निसर्गविषयक भूमिकेला हॅरी हॉरलो यांनीही पाठिंबा दर्शविला आहे. त्यासाठी त्यांनी एक गंमतीदार प्रयोग केला. अगदी अल्पवयीन माकडाच्या पिल्लापुढे त्यांनी कृत्रिमरीत्या तयार केलेल्या दोन आयांचा पर्याय ठेवला. एक अगदी मऊ उबदार अशी कापडी आई होती तर दुसरी खडबडीत तारांची बनविलेली आई होती. या दुसऱ्या आईचे वैशिष्ट्य असे होते की ती दूधही देत होती. असे असतानाही, त्या बालकपीने मऊ उबदार आईचीच निवड केली. अर्थ असा की, कशातऱ्हेची आई मान्य आहे याचे असलेले हे उपजत ज्ञान आहे. काही प्राधान्ये ही अशी नैसर्गिकच आहेत असा दावा, प्रयोगांती हॅरी हॉरलो यांनी केला आहे.

अगदी अलीकडे, म्हणजे १९८० च्या दशकात, प्रकृती की संस्कृती या वादाला रंगत आणणारे, पण, वेगळ्या क्षेत्रातले संशोधन पुढे येऊ लागले. हे संशोधन होते प्राण्यांच्या जिनोम्सच्या संदर्भातील. माशीवरच्या उत्पत्तिविज्ञानातील संशोधनांतून जनुकांचा असा एक छोटासा गट आढळला. (त्याला हॉक्स जनुके म्हणतात!) की जो माशीच्या वेगवेगळ्या अवयवांचे स्थान निश्चित करतो. म्हणजे, माशीचे डोके कुठे असणार, पंख कुठे असणार इत्यादी. ही हॉक्स जनुके अगदी सुरूवातीच्या काळात कार्यरत होऊन शरीराचा नकाशा तयार करतात. पुढे असाच शरीरनकाशा तयार करणारी हॉक्स जनुके उंदरांमध्येही आढळून आली; आणि अलीकडे तर शरीराची योजनाबद्ध रचना ठरविणारी ही हॉक्स जनुके माणसामध्येही आढळून आली. इतर जनुकांप्रमाणेच या हॉक्स जनुकांचीही उघडझाप सतत चालते. वेगवेगळ्या अवयवांमध्ये वेगवेगळ्या वेळी हा उघडबंदचा जनुकीय खेळ चालू असतो. जनुकांचा होणारा परिणाम हा ती केव्हा, कुठे आणि कशी उघडतात, म्हणजे कार्यरत होतात यांवर अवलंबून असतो; आणि तो वेगवेगळ्या प्रकारे होत असतो.जनुकांची अशी उघडझाप करण्याची प्रक्रिया नियंत्रित करणारी बटणे असतात. त्यांना प्रमोटर्स असे म्हणतात. या प्रमोटर्समध्ये झालेला थोडासा

बदलही हॉक्स जनुकांच्या कृतींमध्ये मोठा बदल घडवू शकेल, असे निदान आता करण्यात आले आहे. मात्र त्यासाठी जेनोमच्या लांबलचक सूचीमधून अशा प्रमोटर जनुकांचा शोध घ्यावा लागेल. उत्पत्तिविज्ञानातील या दिशेने चाललेल्या संशोधनाचा परिपाक असा की, प्राण्याची शरीरे ही अशी नियोजित नि कायमस्वरूपी नसतात तर ती उत्क्रान्त होत जातात. तद्वतच, मानवी वर्तनही ठराविक दिशेने आणि विशिष्ट काळात बदलत असते. ही बदलाची प्रक्रिया महत्त्वाची असते. माणसाविषयीची अधिक माहिती या जनुकविषयक संशोधनातून मिळालेली आहे. उदाहरणार्थ, मूल भाषा कसे शिकते ?

मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षा, अगदी त्याच्याशी खूपच साधर्म्य असलेल्या चिंपांझीपेक्षाही वेगळा आहे, तो गुंतागुंतीची व्याकरणाधिष्ठित भाषा शिकण्याच्या बाबतीत. नोम चोम्स्की म्हणतात त्याप्रमाणे, भाषा आत्मसात करण्यासाठी लागणारी व्याकरणक्षमता मेंदूत निसर्गतःच असते, पण त्यामुळेच भाषा येते असे नाही. तर भाषा ही नेहमीच भाषा येणाऱ्या प्रौढांकडूनच मूल शिकत असते. भाषा शिकण्याच्या उत्तम वयात, म्हणजे अगदी लहान वयात, मेंदूमध्ये विशिष्ट जनुके उघडझाप करतात. त्यांतील फॉक्स-पी-२ हे जनुक अलीकडेच शोधण्यात आले आहे. जे भाषा शिकण्याच्या वयात, भाषा शिकण्यासाठी कार्यरत होत असते. लक्षात आले आहे ते असे की, मूल भाषा शिकू पाहते तेव्हा त्याला केवळ फॉक्स-पी-२ हे जनुक असणे पुरेसे नाही तर ते उद्दिपीत करण्यासाठी मुलाला सतत मोठ्या प्रमाणावर भाषा ऐकायला मिळाली पाहिजे. मुलासमोर सारखी बडबड केली गेली पाहिजे.

सामान्यतः प्रत्येकच माणसाला सापाची भीती वाटते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, सापाची भीती ही आपण आपल्या पूर्वजांकडून आनुवांशिकतेने उचलली आहे. आता असे मानले जाते की सापाची भीती वाटण्याची-सापाची भीती वाटणे ही गोष्ट शिकण्याची क्षमता - आपल्याला उपजत प्राप्त झाली आहे. म्हणजेच असे की, कुठलीही गोष्ट शिकण्याची क्षमता आपल्याला निसर्ग बहाल करतो; पण, शिकणे-न शिकणे हे मानवी प्रयत्नांवर अवलंबून असते.

इव्हान पावलो याने शतकापूर्वी याचवर्षी म्हणजे १९०३ मध्ये, आपल्या कुत्र्यांवर प्रयोग केला. अन्न दिसल्यावर लाळ गळणे हा कुत्र्यांचा नैसर्गिक स्वभाव. पण पावलोने अन्न मिळणे आणि त्याचवेळी घंटेचा आवाज येणे या दोन गोष्टींचा परस्पर संबंध कुत्र्यांच्या मनांवर ठसविला. परिणामतः अन्न दिसल्यावरच नव्हे तर ते न दिसताही केवळ घंटेच्या आवाजाने कुत्र्यांची लाळ गळू लागली. या प्रयोगाचा निष्कर्ष अशा की, कुत्र्यांनी आता एक नवीन ज्ञान आत्मसात केले होते. ते म्हणजे घंटी वाजल्याबरोबर आपल्याला जेवण मिळते. या प्रयोगाचा अधिक खोलवरचा आणि माणसाच्या दृष्टीने अधिक उपयुक्त असलेला अर्थ असा आहे की नवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी, मेंदूमध्ये कसा बदल करता येतो हे पावलो यांनी दाखवून दिले होते. आता जनुकांविषयीच्या

आणि मेंदूविषयीच्या नवीन संशोधनातून हा बदल का व कसा घडून येतो याची जाण आली आहे.

क्रेब (CREB) नावाच्या केवळ सतरा जनुकांचे हे कर्तृत्व असते. त्यांच्यात उघडझाप होऊन मेंदूमधील पेशींमधील धाग्यांमध्ये बदल घडून येतात व दीर्घकालीन स्मृती तयार होते. ही जनुके केवळ निसर्गाने ठरवून दिलेले तेच आणि तेवढेच काम करीत नाहीत, तर ती माणसाच्या ताब्यात असतात. स्मृती ही जनुकांमध्ये असते याचा अर्थ ती जनुकांचा वापर करते, ती जनुकांमध्ये आनुवांशिकतेने नसते.

घटना अलीकडची आहे. ११ फेब्रुवारी २००१ च्या 'लंडन ऑबर्झव्हर'मध्ये ठळक बातमी प्रसिद्ध झाली. तिचे शीर्षक होते, मानवी वर्तनाचा गौप्यस्फोट : आपल्या कृतीचा प्रणेता, जनुके नव्हे तर वातावरण ! क्रेग व्हेन्टर यांनी दिलेल्या माहितीवर ही बातमी आधारलेली होती.

जिनोम सशोधनात क्रेग व्हेन्टर यांचा दबदबा आहे कारण, ते स्वत: एक संशोधक असून या विषयाचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्यासाठी, त्यांनी स्वत:ची खाजगी कंपनी उभी केली. त्यांनी अशी माहिती जगापुढे आणली की मानवी समाजामध्ये जी विविधता आढळते तिचे मूळ जेनेटिक कोडमध्ये कायमस्वरूपी कोरलेले नाही तर त्यात वातावरणातील वेगळेपणाचाच फार मोठा वाटा आहे.

१९८०नंतरच्या संशोधनातून आता हे अधिकाधिक स्पष्ट होत चालले आहे की जनुकांचे काम हे अनुभवांच्या सहाय्याने बदलत जाऊ शकते. किंबहुना शिकणे याचाच अर्थ जनुकांची उघडझाप होणे होय. जनुकांचे हे दरवाजे जेवढे उघडावेत तेवढी जनुके अनुभवांना आत्मसात करायला सज्ज होतात. जनुकांचे कार्य हे केवळ माणसाला शिकायला, अनुकरण करायला, लक्षात ठेवायला, भाषा आत्मसात करायला, अभिव्यक्ती करायला, संस्कृती आपलीशी करायला तयारी करून देण्याचे आहे. आपल्या आयुष्यभर ती जागरूक असतात आणि आजूबाजूच्या म्हणजे बाह्य वातावरणानेच त्यांची उघडझाप सातत्याने होऊ शकते. थोडक्यात असे की, माणूस हा जनुकांच्या हातातील कळसूत्री बाहुले नाही, तर बाह्य वातावरण आणि व्यक्तिगत अनुभव यांचे माणसाच्या स्वभावावर, व्यक्तिमत्वावर होणारे परिणामच बरेचसे अपरिवर्तनीय ठरतात. मानवाची नैसर्गिक जडण-घडण हीच मुळी माणसाला आपले आपणच भवितव्य घडवायला साजेशी अशी घडलेली आहे.

■■

*(संदर्भ - मॅट रिडले यांचा २ जून २००३ च्या टाईम साप्ताहिकातील लेख )*

शैक्षणिक

# रचनात्मक शिक्षण आणि शिक्षण परिर्वतन

शिक्षणाच्या क्षेत्रात फार मोठी वैचारिक क्रांती घडून येत आहे; आणि त्याला कारण ठरले आहे ते मानसशास्त्रातील आणि मज्जाशास्त्रातील (NEUROLOGY) नवसंशोधन. जगभरच्या आजच्या पठडीबद्ध शिक्षणाला हादरे बसायला सुरूवात झाली आहे. परीक्षाभिमुख शिक्षण, शिक्षककेंद्री वर्गपद्धती, ऐकून-पाठ करून शिकविण्याची पद्धती, त्यासाठी शाळेत असलेले शिस्तीचे अवडंबर आणि मुख्य म्हणजे शिक्षणाचे जीवनापासून फटकून राहणे, या साऱ्या गोष्टींची युक्तायुक्तता आता कठोरपणे तपासली जात आहे. शिक्षणव्यवहारातील वर्तनवादाचे (BEHAVIOURISM) राज्य संपून तेथे आता रचनावादाचे (CONSTRUCTIVISM) अधिष्ठान-असावे, असा प्रयत्न विशेषतः शालापूर्व आणि शालेय शिक्षणात, जगभरच केला जात आहे.

आता असे सिद्ध झाले आहे की अगदी थेट उच्च पातळीवरील विद्यापीठीय शिक्षणातील तारांकित यशाचे गमक, पार अजून शाळेतही प्रवेश न केलेल्या अल्पवयीन बालकाचे घरचे वातावरण, त्याच्या वा तिच्या घरात घडून येणाऱ्या चर्चांची संख्या नि दर्जा, मूल्यविषयक पायाभूत परिस्थिती, मित्रमंडळींसमवेत घालविलेला अधिकाधिक वेळ आणि स्वतंत्रपणे रस घेऊन केलेले वाचन, यांमध्ये आहे. बालकामधील चौकसपणा ही खरी यशाची गुरूकिल्ली आहे. उपजत चौकसपणाच बालकाला आपले आपण शिकायला उद्युक्त करीत असतो. ज्याला शिक्षणातील रचनावाद असे म्हणतात, तो म्हणजे, मूल आपले आपण उत्सुकतेपोटी ज्ञानाच्या पायऱ्या कसकशा चढत जाते याचे स्पष्टीकरण करणारा, आकलनविषयक शास्त्रज्ञांनी (कॉग्निटिव्ह सायंटिस्ट) मांडलेला नि नवसंशोधनाची बळकटी मिळालेला असा सिद्धांत आहे.

मूल प्रत्यक्षपणे कसे शिकते याबाबतचे अगदी सूक्ष्म असे धागेदोरेही, गेल्या बारा-पंधरा वर्षात उलगडले गेले आहेत. मेंदूविषयक शास्त्र, शरीरविज्ञान, मानसशास्त्र आणि अगदी पुराणवस्तूशास्त्र नि मानववंशशास्त्र या सर्वच शास्त्रांनी पुरविलेले शोधधागे आता बालकाच्या शिकण्याची गोष्ट ही केवळ शाळा नि तेथील शिकविणे यांपेक्षा कितीतरी अधिक कितीतरी मोठी गोष्ट आहे, असे दाखवून देतात. आता कुणी मेंदूची तुलना संगणकाशी करीत नाही. मेंदू ही त्याहूनही अधिक लवचिक, स्वतःहून

परिस्थितीशी जुळवून घेणारी चीज आहे. ती आगळी-वेगळी तरीही बाहेरच्या विविध आव्हानांनी सतत बदलत जाणारी, वृद्धिंगत होणारी आणि न वापरले जाणारे क्षमतांचे धागे स्वतःहून तोडून टाकणारी अशी एक सचेतन गोष्ट आहे.

मेंदूमध्ये चालणारी ज्ञानग्रहणाची प्रक्रिया ही, रचनावादी दृष्टिकोणात मानल्याप्रमाणे जगाचा शोध घेणारी, जगाचा अर्थ लावणारी नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे शिक्षण ही सदैव कृतिशील प्रक्रिया आहे असेच रचनावादाचा दृष्टिकोण मानतो. प्रत्येक नव्या अनुभवास सामोरे जाताना, ती व्यक्ती आपल्या मनात यापूर्वी साठलेल्या अनुभवांच्या प्रतिमांच्या मदतीने समजावून घेत असते. त्यामुळे शिक्षण हे कधीही वस्तुनिष्ठ आणि अप्रत्यक्ष (पॅसिव्ह) असू शकत नाही. ते नेहमीच व्यक्तिगत असते. व्यक्ती स्वतःच नव्या अनुभवांद्वारे स्वतःच्या प्रतिमा निर्माण करीत असते आणि त्यांच्याच आधारे ती बाह्य जगाशी अर्थपूर्ण संबंध जोडीत असते. रचनात्मक शिकणे हा, व्यक्तीचा मेंदू आणि बाह्य वातावरण यांच्यामधील असा वाहता परस्परसंबंध असतो.

शरीरविज्ञानविषयक शास्त्रांनी आपल्याला हे दाखवून दिलेच आहे की, आपण आज जे काही आहोत तो हजारो वर्षांच्या मानवी उत्क्रांतीचा परिपाक आहे. प्रत्येक नव्या पिढीला त्यापूर्वीच्या कित्येक पिढ्यांच्या विकासाचे संचित प्राप्त होत असते. भाषा शिकण्याची आपली क्षमता किंवा छोट्या गटांत राहून परस्पर सहकार्याने राहण्याची कला, विविध प्रश्नांविषयी विचार करण्याची ताकद किंवा भावीकालासाठी नियोजन करण्याची क्षमता नि दुसऱ्याविषयी वाटणारी सहानुभूती हा सर्व पसारा हा त्या संचिताचाच भाग आहे. पिढ्यान्-पिढ्यांच्या या संचितामुळेच मोठी माणसे काय किंवा लहान मुले काय ती परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकतात. परंतु वारसाने प्राप्त होणाऱ्या संचिताच्या वाढीचा वेग मात्र खूप मंद असतो.

असे म्हणतात की, माणसाच्या मेंदूच्या रचनेमध्ये गेल्या तीस हजार वर्षांत कोणतेही महत्त्वाचे फेरफार झालेले नाहीत. पण त्याचबरोबर मेंदूच्या अलीकडच्या अभ्यासांतून हेही कळून आले आहे की केवळ अगदी एका पिढीतही विशिष्ट संस्कृतीचे तात्कालिक अग्रक्रम आणि हजारो वर्षांचे उपलब्ध संचित यांचा मेळ घातला जाऊ शकतो. असे म्हणतात की, तुम्ही माणसाला अश्म युगातून बाहेर काढू शकता पण अश्मयुग मात्र माणसातून बाहेर काढता येत नाही. बदलत्या परिस्थितीशी आपल्याला जरूर जुळवून घेता येते. तरीही हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून आपण घडत गेलो आहोत त्याचे सारे संचितही आपल्यात साठलेले असते. माणूस शिकतो कसे यावर, अलीकडे,

मज्जाशास्त्राने बराच प्रकाश पाडला आहे. मानसशरीरविज्ञानाचे (सायकोबायॉलॉजी) इंग्लिश प्राध्यापक हेन्री प्लॉटकिन यांनी, निसर्गाची निर्मिती आणि मानवी प्रगती यांबाबतचे एक साक्षेपी विधान केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, निसर्गाने स्वतःचीच निर्मिती केली आहे. त्यामुळे, माणसाने स्वतःचे संगोपन-संवर्धन कसे करावे हे या ऐतिहासिक विकासाच्या संदर्भातच जाणून घेता येते. निसर्गातच संगोपन-संवर्धन सामावलेले आहे. माणूस जसे शिकतो, तसे तो का शिकतो, याचे उत्तर या विधानात दडलेले आहे.

आपल्या अनुभवांतून रचनात्मक पद्धतीने जेव्हा मूल शिकते तेव्हा ते एकीकडे आपल्या शिकण्याच्या क्षमताच विकसीत करीत जाते. म्हणजेच आपल्या सर्जनशीलतेच्या, उद्यमतेच्या आणि विविध गोष्टींमधील परस्परसंबंध हेरण्याच्या नि शोध घेण्याच्या क्षमता वृद्धिंगत करते. आजच्या प्रचलित शिक्षणपद्धतीचा दोष असा की, मुलांना शाळेच्या चार भिंतींमध्ये, जीवनाशी सुसंगत असणाऱ्या विविध अनुभवांच्या अभावी, त्यांच्या बौद्धिक नि सामाजिक विकासाला फारच अल्प साथ मिळते. यातूनही वाट काढून काही मुले यशस्वी होतात पण कित्येक मुलांच्या बाबतीत, ना त्यांना शाळेत स्थान मिळते ना जीवनात आपल्याला काही स्थान आहे, असे त्यांना वाटते.

एकेकाळी अतिशय उच्च हेतूंनी तयार झालेल्या या प्रचलित शिक्षणव्यवस्थेने आज मात्र अनेक समस्या तरूण वर्गापुढे निर्माण करून ठेवल्या आहेत. विचारवंतांपुढे या शिक्षणाने निर्माण केलेली असंख्य प्रश्नचिन्हे आहेत. आपण आजवर बालशिक्षणाकडे तद्दन दुर्लक्ष करून प्राथमिक-माध्यमिक स्तरावरील शिक्षण बोजड नि निरस करून ठेवले आहे. एवढेच नाही तर एरवी पालकांनी नि समाजाने सहजपणे करायच्या कित्येक गोष्टींचा बोजा आपण शिक्षकांवर वृथा टाकत चाललो आहोत. ही शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना मोठमोठ्या सुट्या घ्यायला लावते आहे आणि त्याचवेळी प्रौढ जगाचे जीवन आणि सामाजिक जबाबदाऱ्या यांना शाळेचे दरवाजे बंद करून ठेवीत आहे. ज्या वयात मुलांच्या बुद्धी-भावनांना चांगले खतपाणी मिळायचे त्याचवेळी त्यांच्यातील प्रचंड ऊर्जा नि जीवनाशा यांचे आपण खच्चीकरण करीत चाललो आहेत.

एकोणिसाव्या शतकातील उपलब्ध शास्त्रीय ज्ञान नि तत्कालीन वाढत्या औद्योगिकीकरणाची गरज यांतून ही शिक्षणाची कारखाना-पद्धती जन्माला आली. तिने तत्कालीन विद्यार्थ्यांना सार्वत्रिकरीत्या अनेक कौशल्ये देऊन त्यांची उत्पादकता वाढविली; त्यांचे राहणीमानही वृद्धिंगत केले. पण यासाठी जबरदस्त किंमत मोजावी लागली आहे. या कारखाना पद्धतीच्या शिक्षणव्यवस्थेत, अनेकांच्या विविध बुद्धिमत्ता प्रकाशातच

आल्या नाहीत. शाळेच्या, दैनंदिन धबडग्यात अनेकांना औदासिन्याचे, निराशेचे धनी व्हावे लागले. ज्या शालेय दिवसांमध्ये विविध आव्हानांनी जगाचे शोध घ्यायला शिकायचे त्या वयात, त्यांना दुसऱ्या कोणीतरी काय करायचे नि कसे करायचे हेच सदैव सांगत राहण्याची वेळ आली. विसाव्या शतकातील वर्तनवादाचा पगडा असलेल्या शिक्षणव्यवस्थेत, प्रत्येक गोष्ट करण्यासाठी बक्षिसाचे, मार्कांचे आमिष दाखवावे लागले; मुलांचे मेंदू म्हणजे कोरी पाटी मानली जाऊन इतरांनी सूचना देऊन ती भरण्याचे योजावे लागले आणि बुद्धिमत्ताही उपजत आणि आनुवांशिक मानली गेली. त्यामुळे तत्कालीन शिक्षणतज्ज्ञांना शिकण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास ही सुद्धा केवळ शालेय गोष्ट वाटत राहिली.

आता बुद्धिमत्तेच्या संदर्भातील प्राप्त झालेल्या अधिक माहितीमुळे, बौद्धिक विकासाची आपली समज नि कल्पना अधिक स्वच्छ नि नेटक्या झाल्या आहेत. मुलाचे सात-आठ वर्षांपर्यंतचे वय हे त्याच्या आयुष्यभरच्या बुद्धिमत्तेच्या बेगमीचे वय आहे; त्यातही वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत बालकाचा बौद्धिक विकास हा बाह्य उत्तेजन आणि प्रेरणा यांच्यावरच, मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो. सामाजिक समायोजन नि प्रश्न सोडविण्याची क्षमता या बाबी अल्प वयांतच विकसीत झाल्या नाहीत तर पुढच्या वयात त्या आत्मसात करणे खूप कठीण जाते. त्यामुळे सुजाण पालकत्व ही लहान वयातील अत्यावश्यक गरज आहे.

कुमार वयात मुलांच्या हार्मोन्समध्ये असे काही बदल होतात की त्यावेळी मुले प्रौढांवरील परावलंबन झटकून आपण आपले स्वामी होण्याचा प्रयत्न करतात. आपले ज्ञान व्यवहारात वापरू लागतात. मात्र त्यांची आधीच्या बालवयात त्यासाठी आवश्यक ती तयारी झालेली नसेल तर मात्र, मुले, आपल्या या शारीरिक बदलांना पुरेशा शक्तीने सामोरी जाऊ शकत नाहीत नि मग ती भावनिक नि सामाजिकदृष्ट्या अपंग ठरतात. शाळा आणि समाज यांच्यामध्ये पडलेले अंतर हा आजच्या शिक्षणातील कळीचा प्रश्न आहे; अनेक शिक्षणतज्ज्ञांना आता हा प्रश्न उलगडला आहे. रचनात्मक अंगाने पाहता, शिक्षण ही विद्यार्थी-शाळा आणि पालक-समाज यांच्या एकत्रित येण्यातूनच, घडणारी प्रक्रिया आहे आणि त्यानेच हे अंतर भरून निघणार आहे.

विद्यार्थी-समाज असा परस्परसंबंध, वास्तवजीवनाचे भान आणि हेतूपूर्ण शिक्षण या गोष्टी आता बालकाच्या मेंदूच्या विकासाचीही गरज आहेच, याच्या स्पष्टीकरणाने रचनात्मक शिक्षणाची अपरिहार्यता शिक्षणतज्ज्ञांना जाणवत आहे. धोरणकर्ते आणि

शिक्षणाची मागणी करणारा समाज यांच्यात मात्र शिक्षणातील परिवर्तनाची निकड कशी निर्माण होणार आणि प्रबोधनाचे हे व्यापक कार्य कोण कसे अंगिकारणार, हे मात्र नवे प्रश्न आव्हान द्यायला समोर उभे राहिले आहेत.

■■

*(संदर्भ - जॉन ॲबट व टेरिन रियान यांचा एज्युकेशनल लिडरशीप, नोव्हेंबर १९९९, मधील लेख)*

## मादक द्रव्यांच्या विरोधात युद्ध

भारताच्या पूर्वेकडील थायलंड या देशात, मादक द्रव्यांच्या विरोधात मोठे युद्ध पेटले आहे. त्यात आत्तापर्यंत हजारापेक्षाही अधिक लोकांचा बळी गेला आहे. पंतप्रधान थकसीन शिनाव यांच्या सरकारने नार्कोटिक्स या भूमीवरून नाहीसे करण्याची कठेर मोहीम उघडली आणि त्यानंतर महिनाभरातच १३,२३२ लोकांना जेरबंद करून त्यांच्याकडून नार्कोटिक्सच्या सुमारे १० लाख गोळ्या जप्त केल्या आहेत. आणखी ३६२७७ लोकांनी शरणागती पत्करली आहे. ११३८ लोक मृत्यूमुखी पडले आहेत. या हत्या घडवून आणण्यात गुन्हेगारी जगतातील बडी धेंडे आहेत तशीच अगदी शेजार-पाजारची शत्रूमंडळीही आहेत. मानवी हक्क गटांनी मात्र यात पोलीसही सामील असल्याचे म्हटले आहे. थायलंडमध्ये हा रोग खूपच बळावला होता. जगातील सर्वात जास्त मेथाफेटॅम्न्सचा उपभोग घेणारा हा देश आहे. हेरॉईनचा व्यापारही या देशाकरवी मोठ्या प्रमाणावर होत असतो. आज सुमारे तीस लाख लोक सर्रास मादक द्रव्य सेवन करताहेत आणि यांच्यासाठी म्यानमार हा नार्कोटिक्सचा मोठा उत्पादक देश आहे. नागरिकांनी परस्परांविरूद्ध अनेक खोट्या तक्रारी केल्या आहेत. व्यक्तिगत शत्रूंनी परस्पर काटा काढला आहे. पंतप्रधानांनी मात्र या मोहिमेचे समर्थन केले आहे. एका सर्वेक्षणानुसार ९० टक्के लोकांनी या मोहिमेस आपली मान्यता दर्शविली आहे.

■■

*(संदर्भ - टाईम )*

# चीन व कोरियातील बेकारी

चीनने आपल्या साम्यवादाच्या श्रृखंला बऱ्याच प्रमाणात तोडून खुल्या अर्थव्यवस्थेकडे पावले टाकण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे चीनमध्ये होणाऱ्या राजकीय, आर्थिक व समाजिक बदलांकडे सध्या जगाचे लक्ष लागून राहिले आहे. एक बाब अलीकडेच स्पष्ट झाली आहे की, चीनमध्ये सध्या बेकारीचे प्रमाण वाढते आहे. चांगले शिक्षण घेऊन चांगली नोकरी मिळविण्याचे दिवस आता चीनमध्ये राहिलेले नाहीत. आर्थिक सुधारणांना सामोरे जाताना चीनने उच्च शिक्षणाच्या संधी जास्तीत जास्त युवकांपर्यंत पोचतील असे धोरण आखले. यामुळे अनेक क्षेत्रांत कर्मचाऱ्यांचा, कामगारांचा दर्जा वाढून त्यांना चांगल्या नोकऱ्यांच्या संधी मिळून त्यांचे उत्पन्न वाढेल आणि त्याद्वारे देशांतर्गत बाजारपेठेला चालना मिळून अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होईल, असा धोरणकर्त्यांचा अंदाज होता. पण अजून तरी चीनमध्ये, सर्व क्षेत्रांमध्ये आणि विशेषत; माहिती-तंत्रज्ञान व दूरसंचार यांत अपेक्षेप्रमाणे बदल घडून आल्याचे दिसत नाही.

पर्यटन, वाहतूक आणि खाद्यपदार्थ ही व्यवसायाची क्षेत्रे सध्या सार्स (SARS) या रोगामुळे त्रस्त झाली आहेत. त्यामुळे शहरी भागांतील बेरोजगारी ०.१ टक्क्यांवरून ४.५ टक्के एवढी वाढली आहे. यंदा चीनमधील विद्यापीठांमधून सुशिक्षित झालेल्या नवयुवकांचे तर पेव फुटणार आहे. सुमारे वीस लाख विद्यार्थी पदवीचे भेंडोळे हाती घेऊन नोकरीच्या शोधात फिरणार आहेत. चीनमधील एका उच्चपदस्थ नेत्याने यासंदर्भात म्हटले आहे की, " देशाच्या राजकीय व आर्थिक स्थैर्यासाठी या नवयुवकांना रोजगार उपलब्ध करून देणे हे एक गरजेचे पण जिकिरीचे काम ठरणार आहे." चीनच्या नेतृत्वाला हा एक इशारा आहे.

शांघायमधून ८३ हजार पदवीधर बाहेर पडणार आहेत. पण नोकऱ्यांची चणचण असल्याने देशांतर्गत सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेसाठी २७ हजारावर अर्ज दाखल झाले आहेत. (भारतातील परिस्थिती यापेक्षा फारशी वेगळी नसावी !) ग्वांगडोंग हा चीनमधील औद्योगिक व आर्थिकदृष्ट्या चांगला प्रांत समजला जातो. तेथून एक लाख तेरा हजार युवक पदवी मिळवून बाहेर पडणार आहेत आणि त्यापैकी किमान ५० हजार युवकांना

नोकरी मिळू शकणार नाही, असा संबंधित अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. हिलाँगजियांग प्रांतातही अशीच परिस्थिती आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत येथील पदवीधर युवकांची संख्या २५ टक्क्यांनी वाढून ती एक लाखावर पोचली आहे.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन चीनमधील सरकारने उद्योजकता विकासाला चालना मिळावी, यासाठी काही प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. स्वतःचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना बँकेचे कर्ज सुलभ रीतीने मिळावे आणि करात सवलती मिळाव्यात या दिशेने जाण्याचे सरकारचे प्रयत्न आहेत. नोकरशाहीत संख्यात्मक कपात करण्याचे धोरण सरकारने तूर्तास बाजूला ठेवले असून सरकारी नोकऱ्यांमध्ये आणखी भरती करण्यात येईल असे म्हटले आहे. याशिवाय सरकारने नवयुवकांना आपल्या अपेक्षा थोड्या कमी करून ग्रामीण भागाकडे वळण्याचा सल्लाही दिला आहे. शेती, आरोग्य आणि गरिबी दूर करण्याच्या कार्यात युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

विद्यार्थी मात्र अद्याप असमाधानी आहेत. त्यांना शहरी भागात चांगल्या पगाराच्या नोकऱ्या हव्या आहेत. त्यांचे म्हणणे असे की, "आम्ही व आमच्या पालकांनी फार मोठा वेळ, कष्ट व पैसा शिक्षणात गुंतविला आहे. त्याची परतफेड झाली नाही तर युवकांमध्ये असमाधान हे राहणारच आणि हे असमाधान समाजासाठी चांगले नाही." ग्रामीण भागात नोकरी करण्यासाठी जाण्यापेक्षा अनेक युवक शिक्षण संपवून आपल्या पालकांकडे जाणे पसंत करीत आहेत. परदेशी भाषा जाणणाऱ्या किंवा आणखी काही चांगले शिक्षण घेणाऱ्या मोजक्या युवकांनाच नोकऱ्या मिळत आहेत. तुमचे शिक्षण आणि उपलब्ध असलेली नोकरी यांचा मेळ जमणे हे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. चीनमधील नागरिकांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी हा प्रकार नवा आहे, त्यामुळे तेथे अस्वस्थता आहे.

## दक्षिण कोरियातील बेरोजगारी

दक्षिण कोरियात सध्या बेरोजगारी असली तरी त्यांना ती नवीन नाही. १९९८ मध्ये पूर्व आशियातील आर्थिक संकटाच्या वेळी ११.४ टक्के असा बेरोजगारीचा दर झाला होता.

सध्या, चीनप्रमाणेच, येथील बेरोजगारीची झळ नवयुवकांना बसत आहे. मे (२००३) महिन्यात ३.२ टक्के बेरोजगारी होती पण २० ते २९ या वयोगटातील युवकांसाठी हेच प्रमाण ७.१ टक्के एवढे होते. एका सर्वेक्षणानुसार फक्त ५० टक्के

पदवीधरांना नोकऱ्या मिळालेल्या आहेत. या बेरोजगारीसाठी सर्वात महत्त्वाचे कारण `सार्स' हेच आहे, असे मानले जाते. याशिवाय देशांतर्गत अर्थव्यवस्था, इराक-युद्ध, उत्तर कोरियाची अण्वस्त्रविषयक भूमिका ही कारणेही असू शकतात. `कोरिया एम्प्लॉयर्स फेडरेशन' यांच्यातर्फे अलीकडेच करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार शंभरपेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या कंपन्यांनी, आता नवीन भरती करण्यात मोठी कपात केली आहे. याशिवाय नवीन तरूणांना संधी देण्यापेक्षा अनुभवी उमेदवारांना आणि उद्योग-व्यापार व व्यवस्थापनाचे शिक्षण घेतलेल्यांना कंपन्या प्राधान्य देत आहेत.

दक्षिण कोरियातील सरकारने नोकऱ्यांची उपलब्धता वाढविण्यासाठी निधीत दुपटीने वाढ केली आहे. तर श्रम मंत्रालयाने माहिती-तंत्रज्ञानातील नवयुवकांसाठी नोकरभरतीचा मेळावा महिन्यापूर्वी आयोजित केला होता. कोरियातील अनेक परकीय कंपन्या अशा युवकांना उच्चशिक्षणासाठी मदत करीत आहेत.

■■

*(संदर्भ - इकॉनॉमिस्ट २१ जून २००३ )*

## चीनमधील औद्योगिक उत्पादन मंदावले !

गेल्या नऊ महिन्यात, सार्समुळे चीनमधील औद्योगिक उत्पादन मंदावले आहे, असे चीनमधील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. एप्रिल महिन्यापर्यंत अनेक क्षेत्रांतील उत्पादन वाढण्याच्या प्रक्रियेत होते. मात्र मे महिन्यात ते सर्वात मंदगतीने (१२.७ टक्के) वाढले. एप्रिलमध्ये ते १४.९ टक्के होते.

अर्थात सर्व क्षेत्रांमध्ये असे घडलेले नाही. प्लॅस्टिक, कापड,पेट्रोलियमशी संबंधित प्रक्रिया उद्योग आणि पेयांच्या क्षेत्रातील उत्पादन घटले आहे. ही घट फक्त सार्समुळे झाली असून ती तात्पुरतीच असेल असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे. कोळसा, तेल, ऊर्जा, रसायने, पोलाद या उद्योगांमधील उत्पादन वाढले आहे. औषधउद्योगाने मात्र उत्पादन वाढीत आघाडी मिळवली आहे. एका वर्षात ३५.४ टक्के अशी ही वाढ झाली आहे.

सामाजिक

# विनोद आणि बुद्धिविकास

विनोद ही काही हसण्यावारी नेण्यासारखी गोष्ट नाही. ते मानवाचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. मानवी जीवनाचा तो एक आर्कषक आणि उपयुक्त भाग आहे. त्यामुळे अलीकडे विनोद हा विषय काहींचा अभ्यासाचा नि संशोधनाचा विषय झाला आहे.

लहान मूल किंवा बालकाचा जो काही वाढत्या प्रमाणात आणि वेगवेगळ्या शास्त्रांमध्ये अभ्यास केला जात आहे, त्यातही मुले आणि हास्यविनोद या विषयाकडे जाणत्यांचे लक्ष वेधले आहे. या विषयावर आता संशोधनपर अभ्यास होताहेत तसेच चर्चासत्रे नि अधिवेशनेही भरविली जात आहेत. या विषयाला आता प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. `विनोदा'ला व्याख्यांमध्ये अडकवणे तसे कठीण आहे. विनोदासाठी - म्हणजे विनोद समजण्यासाठी आणि करण्यासाठीही - बौद्धिक कार्यदक्षतेची विवक्षित पातळी आवश्यक असते काय ? आणि असल्यास ती नेमकी कोणती ? अभ्यासकांमध्ये यांविषयी मतभेद आहेत. एक गोष्ट मात्र सर्वांनाच मान्य दिसते. ती म्हणजे, हास्यविनोदामध्ये खेळासदृश असा आनंददायक भाग असतो; आणि कोणत्याही वयांत तो असतोच.

आई किंवा बाबा आपल्या अगदी चार-सहा महिन्यांच्या सोनुल्याकडे बघून वेडी-वाकडी तोंडे करून नाचतात आणि बाळ खदाखदा हसते तेव्हा त्या बालकाला ते चेहरे विनोदी वाटतात का ? विनोदी वाटतात म्हणून ते हसते का ? एखादे तीन-साडेतीन वर्षांचे मूल आपणच काहीतरी वेड्या-वाकड्या शब्दांची निर्मिती करून खदाखदा हसते, तेव्हा देखील त्याला आपल्या त्या निर्मितीत विनोदाचा प्रत्यय येत असतो का ? पण तसे नसावे. कारण, विनोदासाठी काही एका नेटक्या बौद्धिक प्रक्रियेची गरज असते, असे अनेक संशोधकांचे मत आहे.

विसंगतीतून विनोद निर्माण होतो याविषयीही अभ्यासकांमध्ये मतभेद नाहीत. सामान्यतः एकमेकांबरोबर न जाणाऱ्या दोन गोष्टी एकत्र आल्या की विसंगतीनिर्मित विनोद होऊ शकतो. हत्ती टबमध्ये बसून आंघोळ करतोय हे दृश्य, लहान मुलांना हसण्यासाठी पुरेसे ठरते; कारण, त्यात दोन परस्परविसंगत ठरणाऱ्या गोष्टी तर एकत्र आल्याच आहेत; पण पाहताक्षणीच आश्चर्यचकित व्हावे अशा त्या आहेत. एकदम चकित होणे हेही विनोदाचे एक लक्षण आहे. मुलांच्या बदलत्या वयाबरोबर त्यांना

भावणाऱ्या, आवडणाऱ्या विनोदांची जात बदलत असते. वाढत्या वयाबरोबर मुलांचे हसू येण्याचे विषयही बदलतात. पण इतकेच नाही. शास्त्रज्ञ म्हणतात, मुलांच्या बाबतीत, त्यांच्या `विनोद विकासाच्या पायऱ्या'या त्यांच्या बौद्धिक विकासाच्या पायऱ्यांशी संलग्न असतात. उदाहरणार्थ, वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वयाला, जेव्हा मुले वस्तू-वस्तूंमधील भेद करू शकतात, तेव्हा, तुमच्या हातावर खाऊ म्हणून एखादा दगड ठेवतील आणि या विनोदाने मनमुराद हसतील. परंतु, शब्द अनेकार्थी असू शकतात आणि द्व्यर्थी शब्दाच्या वापरातून विनोद होऊ शकतो हे कळायला मात्र पियाजेने सांगितलेल्या, बालकांच्या बौद्धिक विकासाच्या अवस्थांमधील अखेरची म्हणजे आकारिक मूर्त अवस्था (क्रॉंक्रिट ऑपरेशन्स) यावी लागते. त्यासाठी वयाची निदान अकरा-बारा वर्षे उलटावी लागतात.

विनोदाचेही वेगवेगळे प्रकार असतात. कोट्यांसारखे शाब्दिक विनोद कळायला, भाषिक लकबींची जाण यावी लागते. तर घटनांवर आधारित विनोद कळायला विचारांतील तार्किकता ओळखीची असावी लागते. (हत्ती खोल नदीत पडला तर लगेच काय होईल ?...तो भिजेल ! किंवा एवढा मोठा हत्ती फ्रीजमधून बाहेर कसा पडेल ?.......थंडीने काकडून !) संशोधनात आता असेही सिद्ध झाले आहे की मुलांच्या बाबतीत हास्यविनोद ही केवळ करमणुकीची बाब नव्हे. टवाळ मुलांना न आवडणारी नि केवळ वेळ घालविण्याची ती एक निरर्थक गोष्ट नाही. तर ती आहे बौद्धिक उत्तेजना देणारी एक अतिशय प्रभावी अशी गोष्ट. पुस्तकातली, टी,व्हीमधली किंवा गप्पांमधली विनोदी प्रहसने मुलांना आवडतात आणि ती त्यांना बौद्धिक खाद्यही पुरवितात. विनोदाच्या सहवासाने मुलांचा कोणत्याही गोष्टीवर (म्हणजे अगदी अभ्यासाच्या कोरड्या विषयांवरही) लक्ष केंद्रित करण्याचा कालावधी वाढतो. मुलांची उत्सुकता ताणली जाते, आणि त्याने चांगलाच बौद्धिक व्यायाम घडतो.

मोठ्यांपेक्षाही मुलांच्या जीवनात आणि त्यांच्या भावी विकासात विनोदाचे स्थान मोठे आहे. मुलांचा स्वाभाविक असणारा मनाचा खेळकरपणा हास्यविनोदाला तितक्याच सहजतेने आपलासा करीत असतो.

आता शाळांच्या भिंती `सुविचारां'नी मळण्यापेक्षा हास्यविनोदांनी सजल्या तर शाळाशाळांमधून अधिक प्रसन्न आणि म्हणून अधिक शैक्षणिक वातावरण निर्माण होऊ शकेल. ■■

सामाजिक

# लसीकरण व प्रदूषण

बालपणापासून उत्तम आरोग्याचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे लसीकरण होय, हे आता जगभर मान्य झाले आहे. विकसित राष्ट्रांची गोष्ट बाजूला ठेवली तरी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांनी मनावर घेऊन लसीकरणाची मोहीम खेड्यापाड्यांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला आहे, हे महत्त्वाचे आहे. शिक्षणापासून दुरावलेल्या नागरिकांचे प्रबोधन करून त्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करणे हे एक मोठे जिकिरीचेच काम होते. पण आज एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीला तरी लसीकरण बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले आहे. बालकांना आरोग्यदायी ठरलेले हे यशस्वी लसीकरण, आता, भारतात मात्र प्रदूषणाला कारणीभूत ठरते आहे ही एक काळजीची बाब आहे. लसीकरणात वापरण्यात येणाऱ्या सुया व सिरिंज हे नष्ट करताना प्रदूषण फार वाढते, असे लक्षात आले आहे.

भारतात दरवर्षी २ कोटी ५० लाख मुले जन्माला येतात. लसीकरणाच्या कार्यक्रमातंर्गत प्रत्येक बालकाला किमान ८ इंजक्शने घ्यावी लागतात. कोणत्याही प्रकारचा जंतुसंसर्ग होऊ नये यासाठी प्रत्येक बालकासाठी, दर इंजक्शनच्या वेळी वेगळी सुई व सिरिंज वापरली जाते. या सर्व प्रकारात किमान १२ कोटी सिरिंज या कचरा म्हणून जमा होत असतात. या कचऱ्यातील सुया व सिरिंज पुन्हा वापरण्याच्या घटनाही अनेकदा घडल्या असून त्यातून आरोग्याचे आणखी नुकसान झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे सध्या `ऑटो डिसेबल' या प्रकारच्या सिरिंज वापरल्या जातात. एकदा वापरल्यावर त्या आपोआपच निकामी होतात. लसीकरणाच्या सर्व योजनांमध्ये याच प्रकारच्या सिरिंज वापरणे अत्यावश्यक असल्याचे जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ आणि संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकसंख्या निधी, या संस्थांनी म्हटले आहे. हे वापरणे अत्यावश्यक आहे, यावर दुमत नाही पण हा कचरा नष्ट कसा करायचा हे मात्र या मोठ्या संस्थांनी स्पष्ट सांगितलेले नाही. सर्व विकसनशील देशांमध्ये या कचऱ्याची समस्या आहे. हा केवळ भारताचा प्रश्न नाही.

थायलंडमधील रूग्णालयांमधील ३० टक्के कचरा हा या सिरिंजचा असतो. बांग्लादेशातही आता या सिरिंज वापरल्या जाऊ लागल्या आहेत. दक्षिण आफ्रिका

आणि नेपाळमध्ये देखील हा कचरा वाढत असल्याचे आढळले आहे. लसीकरण राबविताना हा कचरा वाढणार हे ओघाने आलेच. पण या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची, याचे प्रशिक्षण मात्र या देशांमध्ये देण्यात आलेले नाही.

सर्वसाधारणपणे हा कचरा इनसिनरेटर्समधून जाळण्याची पद्धत सर्वत्र वापरली जाते. पण यातून आरोग्याला घातक असे वेगवेगळे वायू वातावरणात पसरतात, म्हणून ही पद्धत फारशी चांगली समजली जात नाही. दुसरी पद्धत म्हणजे हा कचरा एका छोट्या संरक्षित डब्यात साठवितात. प्रत्येक सुई व सिरिंज वापरल्याबरोबर या डब्यात टाकण्यात येतात. साधारणपणे शंभर सिरिंज एवढा कचरा यात जमा झाल्यावर जमिनीत खड्डा करून हा डबा तेथे जाळण्यात येतो. यातूनही प्रदूषण होतेच पण सध्या ही सर्वात स्वस्त व सोपी पद्धत असल्याने ग्रामीण भागात युनिसेफतर्फे याचा प्रचार करण्यात आला आहे. विकसित राष्ट्रांमध्ये मात्र या पद्धतींना दूर करण्यात आले आहे.

हा कचरा नष्ट करण्यासाठी काही पर्यायी पद्धतीही आहेत. पण त्याचा प्रचार-प्रसार मात्र होताना दिसत नाही. पर्यायी पद्धत अशी की, हा कचरा कोणत्याही पद्धतीने न जाळता, तो उच्च तापमानावर गरम करण्यात येतो. याद्वारे तो निर्जंतुक होतो. मग त्यातील पोलाद व प्लॅस्टिकचे घटक वेगवेगळे करण्यात येऊन ते पुर्नप्रक्रिया करण्यासाठी संबंधित उद्योगाकडे पाठविण्यात येतात. हा कचरा निर्जंतुक करण्यासाठी मायक्रोवेव्ह, ऑटोक्लेव्ह आणि हायड्रोक्लेव्ह असे तीन प्रकार वापरता येऊ शकतात. बंगलोर येथील कमांड हॉस्पिटल एअर-फोर्स यांनी केलेल्या एका अभ्यासाद्वारे असे स्पष्ट झाले आहे की एक किलो सिरिंज नष्ट करण्यासाठी या पद्धतीद्वारे फक्त ८५ पैसे खर्च होतात. एवढा कचरा जाळण्यासाठी मात्र हा खर्च ३ रुपये ७० पैसे एवढा होतो. ग्रामीण भागात या कचऱ्याचे प्रमाण फारसे जास्त नसले तर तेथे ऑटोक्लेव्हिंग पद्धत योग्य ठरू शकते.

भारतातील काही रूग्णालयांनी कचरा न जाळता अशा पर्यायी पद्धतींचा अवलंब सुरू केला आहे. तसेच डेहराडून जवळ असणाऱ्या `हिमालयन इन्स्टिट्यूट ट्रस्ट हॉस्पिटल' यांनी या कामी पुढाकार घेऊन आजूबाजूच्या गावांतील असा कचरा गोळा करणे व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम हाती घेतले आहे.

हा कचरा जाळणे धोकादायक असतानाही भारतात मात्र याचाच प्रसार का करण्यात येतो आहे ? ■■

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ १५ मे २००३ )*

आर्थिक

# जागतिक व्यापार संघटना व शेती

जागतिक व्यापार संघटनेची, मंत्रीस्तरावरील चर्चेची पाचवी फेरी, येत्या १० ते १४ सप्टेंबर २००३ या काळात, मेक्सिको येथील कॅन्कम येथे होत आहे. यावेळी इतर काही विषयांबरोबर, शेतीविषयक व्यापाराची चर्चा प्राधान्याने होणार आहे. विकसित राष्ट्रे विरूद्ध विकसनशील राष्ट्रे असे जे चित्र व्यापार संघटनेच्या कामकाजात नेहमी आढळले, तसेच काहीसे यावेळीही घडण्याची शक्यता आहे. यासंबंधी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरू शकणाऱ्या व्यापारविषयक धोरणांची ही ओळख.

## शेतीविषयक करार

शेतीसंबंधीचा व्यापार खुला करण्याच्या उद्दिष्टाने शेतीसंबंधीची अनुदाने कमी करावीत आणि शेतीमालाच्या आयातीवरील निर्बंध उठवून त्यांवरील आयातशुल्क कमी करावे, असा एक प्रस्ताव आहे. यापूर्वी दोहा येथे झालेल्या बैठकीत यासाठी काही निश्चित कालावधी ठरविण्यात आला होता. या कालावधीबाबत अनौपचारिक चर्चा करण्यासाठी गेल्या मार्च महिन्यात टोकियो येथे काही देशांमधील नेत्यांची बैठक झाली. यावेळी व्यापार संघटनेच्या शेतीविषयक समितीचे अध्यक्ष स्टुअर्ट हर्बिन्सन यांनी एक प्रस्ताव मांडला. तो असा की, "औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांनी पुढील पाच वर्षात, निर्यातीवरील अनुदानात ५० टक्के कपात करावी आणि एकूण ९ वर्षात ती शून्यावर आणावी. यासाठी विकसनशील राष्ट्रांना अनुक्रमे ९ व १२ वर्षे देण्यात यावी. यात असेही सुचविण्यात आले होते की, विकसित देशांनी शेतीमालाबाबतचे सर्व प्रकारचे आयातशुल्क पाच वर्षात ४० ते ६० टक्क्यांनी कमी करावे आणि विकसनसील राष्ट्रांनी १० वर्षात ते २७ ते ४० टक्क्यांनी कमी करावे." पण हा प्रस्ताव शेतीमालाची आयात व निर्यात करणाऱ्या कोणत्याच देशांना मान्य झाला नाही.

जपानला असे वाटले की, यामुळे तांदुळाच्या बाजारपेठेचे मोठे नुकसान होईल. युरोपियन युनियनला अनुदानातही कपात करायची नाही आणि शेतीक्षेत्र खुलेही करायचे नाही. अमेरिकेच्या प्रतिनिधींचे म्हणणे असे की, विविध देशांमध्ये

अनुदानात व आयातशुल्कात असलेली तफावत दूर करण्यासाठी काही ठोस उपाययोजना हवी. भारत, केनिया, नायजेरिया या देशांचे म्हणणे असे की विकसित देशांनी आयातशुल्क पूर्णपणे काढून टाकणे, ही पूर्वअट हवी. भारताचे वाणिज्य व औद्योगिक खात्याचे मंत्री अरूण जेटली यांनी म्हटले आहे की, "विकसित राष्ट्रांनी जर त्यांच्या देशांतील अनुदाने काढून टाकली तरच विकसनशील राष्ट्रांना आपल्या शेतीमालाच्या निर्यातीवरील अनुदानाबाबत व आयातशुल्काबाबत काही निर्णय घेता येईल. कारण, असा कोणताही निर्णय हा विकसनशील देशांमधील शेतकऱ्यांवर थेट परिणाम करणारा ठरू शकतो." पण विकसित राष्ट्रे आपले देशांतर्गत अनुदान कमी करण्यास तयार नाहीत. त्यामुळे श्रीमंत देशांतील मूठभर शेतकऱ्यांच्या फायद्याचा पण विकसनशील देशांतील हजारो गरीब शेतकऱ्यांचे नुकसान करणारा व्यापारी करार मान्य होणार नाही, अशी सध्याची लक्षणे आहेत.

विकसनशील देशांमधील आयातशुल्क जास्त असून ते त्यांनी कमी करावे असे अमेरिकेचे म्हणणे आहे. तांत्रिकदृष्ट्या अमेरिकेचे म्हणणे बरोबर असले तरी विकसनशील राष्ट्रांची याबाबतची भूमिका अशी आहे की, विकसित राष्ट्रे देशांतर्गत अनुदाने मोठ्या प्रमाणावर देतात. गरीब राष्ट्रे आर्थिक परिस्थितीमुळे अनुदाने देऊ शकत नाहीत. तेव्हा संरक्षणवादी भूमिकेतून त्यांना आयातशुल्क वाढविणे हे गरजेचे ठरते. (अमेरिकेने देखील आपल्या पोलाद उद्योगाला संरक्षण देण्यासाठी आयात करण्यात येणाऱ्या पोलादावरील आयातशुल्कात मोठी वाढ केल्याची घटना ताजीच आहे.) देशांतर्गत अनुदानामुळे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमालाचे भाव कृत्रिम मार्गाने कमी राहण्यास मदत होते. अनुदान काढून घेतले तर भाव वाढतील व याचा विकसनशील राष्ट्रांना दोन प्रकारे फायदा होईल, असे या विषयातील भारतातील तज्ज्ञ विश्वजित धर म्हणतात. एक म्हणजे, विकसित राष्ट्रांमधील बाजारपेठेत प्रवेश करणे सोपे जाईल; दुसरे म्हणजे, विकसित देशांमधून होऊ शकणाऱ्या स्वस्त आयातीचा मुद्दा उद्भवणार नाही. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांनी आपल्या देशातील शेतीला अनुदान दिल्याने व सरंक्षणवादी भूमिका स्वीकारल्याने विकसनशील देशांमधील शेतीविषयक व्यापारात दरवर्षी २६ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढे नुकसान होते, असे `इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या एका अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

युरोपियन युनियनने शेतीच्या खुल्या व्यापाराला नेहमीच विरोध केला आहे. शेतीमालाचा व्यापार हा प्रत्येक देशातील ग्रामीण अर्थव्यवस्थेशी, समाजाशी आणि

जमीन, पाणी या अर्थानें तेथील पर्यावरणाशी संबंधित असतो, त्यामुळे त्याच्या आंतरराष्ट्रीयिकरणाला व श्रमविभागणीला मर्यादा या येणारच, असे स्पष्ट प्रतिपादन युरोपियन कमिशनचे व्यापारविषयक अधिकारी पास्कल लॅमी यांनी केले आहे. खुल्या व्यापाराला आपला पूर्णपणे पाठिंबा आहे आणि आपण अनुदाने कमी करण्यास तयार आहोत, असे अमेरिकेने म्हटले असले तरी अमेरिकेची भूमिका दुट्टपीपणाची आहे. कारण, अमेरिकेत ज्या प्रकारे अनुदाने दिली जातात तो प्रकार जागतिक व्यापार संघटनेच्या अखत्यारीत येत नाही. म्हणजे वरकरणी अनुदानात कपात केल्यासारखे दाखविले तरी `नॉन ट्रेड डिस्टॉर्टिंग सबसिडीज' या नावाखाली अमेरिकेतील शेतकऱ्यांना अनुदाने मिळू शकतात. याशिवाय नवे `फार्म बील ' (२००२) आणून अमेरिकेने आपल्या शेतकऱ्यांची सोय आधीच करून ठेवली आहे. या विधेयकाप्रमाणे अमेरिकेतील सरकारला शेतीला मोठी मदत करता येणार आहे.

विकसनशील देशांसाठी आणखी एक महत्त्वाची बाब अशी की, कोणताही व्यापारी करार लागू करताना विकसित राष्ट्रांसाठी वेगळे व विकसनशील राष्ट्रांसाठी वेगळे नियम आणि वाढीव कालमर्यादा याचा विचार करणे हे अपेक्षित आहे. कारण, या राष्ट्रांतील नागरिकांच्या दृष्टीने ग्रामीण भागातील रोजगार, विकास आणि अन्नधान्यविषयक सुरक्षा हे विषय अतिशय महत्त्वाचे आहेत.

## बौद्धिक संपदा कायदा

या चर्चेच्या फेरीत शेतीविषयक करारातील बदलांप्रमाणेच बौद्धिक संपदा कायद्यातही दुरूस्ती सुचविण्यात आली आहे. या कायद्याप्रमाणे विकसनशील देशांना विकसित देशांमधील तंत्रज्ञानाची नक्कल करता करता येत नाही. त्यामुळे विकसनशील देशांमधील नागरिकांना काही महागडी पण जीवनावश्यक औषधे श्रीमंत देशांमधील औषध कंपन्यांकडून विकत घ्यावी लागतात. या कायद्यात दुरूस्ती केली तर ही औषधे विकसनशील देशांना तयार करता येऊन ती नागरिकांना स्वस्त दरातही देता येणे शक्य होणार आहे. तसेच ती औषधे इतर विकसनशील देशांकडे निर्यातही करता येणार आहेत. या औषधांमध्ये एड्सवरील औषधांचाही समावेश आहे. सध्याच्या कायद्यात ही सुधारणा न झाल्यास विकसनशील देशांमधील अनेक नागरिकांना ही महागडी औषधे विकत घेता येणार नाहीत व औषधोपचाराअभावी त्यांना आपले प्राण गमवावे लागतील अशी शक्यता आहे. विकसित देशांमधील औषध कंपन्यांचा या कराराला विरोध असून त्यांना विकसनशील राष्ट्रांमधील आपली बाजारपेठ सोडायची नाही.

आणखी काही करार

याशिवाय पूर्वीच मांडलेले आणखी काही करार चर्चेत आहेत; तर काही नवे करार होऊ घातले आहेत. विकसनशील देशांनी आपली सेवाक्षेत्रे उदाहरणार्थ, पाणी, ऊर्जा, वाहतूक, आरोग्य व शिक्षण इत्यादी,परकीय कंपन्यांसाठी खुली करावी, या क्षेत्रांवरील सरकारचे नियंत्रण कमी करावे, या क्षेत्रांमध्ये स्थानिक कंपन्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने बंद करावे, अशा अर्थाचा प्रस्ताव पूर्वीच मांडण्यात आला आहे. शेतीशिवाय अन्य उत्पादनांवरील आयातशुल्क रद्द करावे, म्हणजे लाकूड, मासेमारी आणि नैसर्गिक साधनस्रोतांचा खुला व्यापार करावा असाही एक प्रस्ताव आहे. कधीकधी व्यापारात, पर्यावरण किंवा इतर काही बाबींवरून वाद होतात. तेव्हा वादग्रस्त मुद्यांच्या वेळी पर्यावरणाशी संबंधित असलेला क्योतो करार व जागतिक व्यापार संघटनेत करण्यात आलेले करार या दोन्हींमध्ये कोणत्या कराराला महत्त्व द्यायचे ? अशाही काही विषयांवर या बैठकीत चर्चा होणार आहे. गुंतवणूक व इतर काही नवे व्यापारविषयक मुद्दे नव्या करारांमध्ये मांडण्यात येणार आहेत.

दरम्यान, जागतिक व्यापार संघटनेच्या सभेत भारत सरकारने काय भूमिका घ्यावी याविषयी उद्योगक्षेत्राने आपले विचार कळवावे, असे भारत सरकारने संबंधित संस्था-संघटनांना सांगितले आहे. पण उद्योग संघटनांमध्ये यावर अजून एकमत झालेले नाही. शेतीसंबंधीचा व्यापार किती व कशाप्रकारे खुला करायचा यावर नेमकी भूमिका घेण्यात आलेली नाही. खुल्या व्यापाराचे सूत्र स्वीकारले तर काही फायदे होऊ शकतात. पण त्यातून होणारे तोटेही भारतासारख्या विकसनशील देशांना, फार मोठे ठरू शकतात. त्यामुळे कॅन्कम येथील चर्चा फारसे काही निष्पन्न न होता संपण्याची किंवा नुसतीच वादळी ठरण्याची शक्यता आहे.

*(संदर्भ - डाउन टू अर्थ, इकॉलॉजिस्ट , इकॉनॉमिक टाइम्स , इंटरनेट )*

**अर्थबोधपत्रिकेचा दिवाळी अंक**
**`आशियातील शेजारी राष्ट्रांची समाजस्थिती '**
**१० ऑक्टोबर २००३ रोजी प्रसिद्ध होईल.**

औद्योगिक

# शेती व माहिती-तंत्रज्ञान

भारतातील एखाद्या छोट्याशा खेड्यात माती-विटांच्या घरात, एका कोपऱ्यात संगणक दिमाखाने जागा मिळवून आहे आणि त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक व बाजारपेठेसंबंधीची विविध प्रकारची माहिती मिळून त्यांच्या मिळकतीत वाढ होत आहे, हे चित्र कल्पनेतील वाटले तरी ते प्रत्यक्षात उतरविले आहे आय.टी.सी. या कंपनीने. आय.टी.सी. म्हणजे इंडियन टोबॅको कंपनी. ही भारतातील सर्वात मोठी तंबाखू उत्पादक कंपनी असली तरी शेतीसंबंधीच्या उत्पादनांची खरेदी-विक्री करण्यातही ही कंपनी आघाडीवर आहे. शेतकऱ्यांनी या कंपनीमार्फत खरेदी-विक्रीचे व्यवहार करणे हे कंपनीला फायदेशीर ठरणार होते. पण त्यासाठी शेतकऱ्यांची मिळकत वाढणे अत्यावश्यक होते. मग या कंपनीने एक अभिनव योजना राबविली. माहिती-तंत्रज्ञानाचा उपयोग करून या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकेल असे प्रयत्न त्यांनी केले.

गेल्या तीन वर्षांपासून उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, कर्नाटक व आंध्रप्रदेश या चार राज्यांमधील छोट्या-छोट्या खेड्यांमध्ये या कंपनीने दोन हजार `किओस्क ' किंवा `इ-चौपाल ' (म्हणजे `एकत्र येण्याची जागा') स्थापन केले. पण नुसते एवढेच उपयोगाचे नव्हते. किओस्कमध्ये संगणक पुरविले तरी संगणक साक्षरता, सतत बंद पडणारे दूरध्वनी आणि खंडित वीजपुरवठा हे मोठे अडथळे होते. यासाठी कंपनीने खेड्यातील अल्पशिक्षित नवयुवकांना संगणक साक्षर केले. सौरऊर्जा वापरून विजेचा प्रश्न सोडविला आणि सॅटेलाईट फोनचे जाळे खेड्यांपाड्यांत पोचविले. यासाठी प्रत्येक किओस्कमागे सुमारे दीड लाख रुपये खर्च करून कंपनीने या प्रकल्पात फार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. अशाच मार्गाने किमान एक लाख खेड्यांना जोडण्याची या कंपनीची योजना आहे.

किओस्क किंवा इ-चौपालचे काम कसे चालते ? कंपनीने काही शेतकऱ्यांना मदतीला घेतले. उदाहरणार्थ, मध्यप्रदेशातील कमलापूर या खेड्यात बैलगाडी व सायकल यांशिवाय इतर वाहनेही दिसणे दुर्मिळ. तरी येथील संजय शर्मा या शेतकऱ्याला कंपनीने इ-चौपाल चालविण्यासाठी नियुक्त केले. त्याच्या घरी कंपनीने संगणक बसविला. संगणकाला कधीही हात न लावलेल्या या शेतकऱ्याच्या घरी आता इंटरनेटही

आहे. आपल्या ३५ एकराच्या शेतीवर सोयाबीनचे उत्पन्न घेणारा हा शेतकरी शेती करण्याबरोबरच, आपल्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांना शेतीविषयक अत्याधुनिक माहिती देतो आहे, शर्मा यांची तेरा-चौदा वर्षांची मुले या शेतकऱ्यांना बाजारपेठ व भावातील चढ-उतार सांगत आहेत, असे येथील चित्र आहे. आय. टी.सी. ही कंपनी इ-चौपालच्या माध्यमातून या छोट्या शेतकऱ्यांकडून थेट माल विकत घेत आहे. गेल्या वर्षी (२००१-२००२) या कंपनीने आपल्या खरेदीपैकी २५ टक्के खरेदी (सुमारे २५० कोटी रुपये) इ-चौपाल कडून केली. तसेच याचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयांचे बी-बियाणे व खते विकून नफा मिळविला. आपल्या शेतीमालाला चांगला भाव मिळत असल्याने खेड्यातील बहुतेक शेतकरी आता आय.टी.सी.लाच आपला माल विकतात व त्यांच्याकडूनच बी-बियाणे विकत घेतात. इ-चौपालवरून आय.टी.सी.ला माल विकण्याचे नक्की झाल्यावर या शेतकऱ्यांना, खेड्यातील कंपनीच्या वेअरहाऊसमधून रोख रक्कमही मिळू शकते. या सर्व सोयींमुळे कंपनीचा व शेतकऱ्यांचा असा दोघांचाही, व्यवहार करताना होणारा किमान ६ टक्के खर्च वाचतो आहे.

आय.टी.सी.ने शेतकऱ्यांना शेतीविषयक इतरही सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. उदाहरणार्थ, मातीची शास्त्रशुद्ध तपासणी, उच्च दर्जाचे बी-बियाणे मिळण्याची हमी आणि योग्य वेळी योग्य त्या प्रमाणात खते मिळण्याची सोय यांमुळे येथील शेतकऱ्यांचे दर एकरी उत्पादन ५ ते १० टक्क्यांनी वाढले. "ग्रामीण भागातील नागरिकांची मिळकत व खरेदीशक्ती वाढली पाहिजे. खेड्यांची अर्थव्यवस्था सुधारणे हे गरजेचे आहे. या नागरिकांनी शेतीसंबंधी वा इतर ग्राहकोपयोगी उत्पादने विकत घ्यावी यासाठी त्यांचे राहणीमान चांगले असण्याची गरज आहे. त्यांची मिळकत वाढली की आपोआपच तुमचा ग्राहकवर्ग वाढतो," असे आय.टी.सी.चे खरेदी-विक्री व्यवस्थापक राम कुमार म्हणतात.

यासंदर्भात जलालुद्दिन काझीचे उदाहरण बोलके आहे. हा खेड्यातील एक सधन, मध्यमवयीन शेतकरी. याने इ-चौपालचा उपयोग सर्वप्रथम केला. आज आय.टी.सी.ने इ-चौपालच्या माध्यमातून आणलेल्या बहुतेक सर्वच ग्राहकोपयोगी वस्तू त्याने खरेदी केल्या आहेत. त्याच्या दुमजली घरात त्याच्या शाळकरी मुलांसाठी सायकली, त्याच्यासाठी मोटरसायकल, बैठकीच्या खोलीत रंगीत दूरचित्रवाणीचा संच, सोनीचा व्हिसीडी प्लेअर, आयवाचा छोटा स्टिरिओ असे सर्वकाही आहे. बाजारात नवीन येणारी इतरही उत्पादने घेण्याची त्याची इच्छा आहे. त्याच्या दहा एकराच्या शेतीतून आय.टी.सी.च्या इ-चौपालच्या

मदतीने त्याची खरेदीशक्ती वाढली तर खेड्यांपाड्यांतही ग्राहकोपयोगी वस्तूंचा खप वाढू शकतो, याचे हे प्रत्यक्ष उदाहरण आहे.

आय.टी.सी.चा यशस्वी प्रयोग पाहून आय.सी.आय.सी.आय. बँकेने आपल्या विमा कंपनीला इ-चौपालचा वापर करू देण्याची परवानगी आय.टी.सी.कडे मागितली. इ-चौपालचे काम सांभाळणारे शर्मा यांच्यावर मोहम्मद आरिफ यांचा विश्वास असल्याने आरिफ यांनी प्रथम विमा उतरविला. मग त्यांनी शेती करणाऱ्या आपल्या भावाला इ-चौपालचा उपयोग करून घेण्यास तयार केले. त्याचेही शेतीचे उत्पन्न वाढले. शर्मा यांनी इ-चौपालचा वापर करून आत्तापर्यंत २२ विमाधारक आय.सी.आय.सी.आय. बँकेला मिळवून दिले आहेत. यामुळे आता आय.सी.आय.सी.आय.चा उत्साह वाढला आहे.

दरम्यान आय.टी.सी.ने खाद्यतेल, मीठ, साखर व इतर जिन्नसही इ-चौपालद्वारे विकण्यासाठी इतर कंपन्यांशी चर्चा सुरू केली आहे. यासाठी बाजारपेठेचा शास्त्रीय अभ्यास करण्यात येत आहे. एका बाजूला कोक व पेप्सी यांनी ग्रामीण बाजारपेठेचा केलेला अभ्यास आपल्याला उपयोगी ठरेल, असे आय.टी.सी.ला वाटते. तथापि दुसरीकडे, मुंबईतील अभ्यास करणाऱ्या संस्थांपेक्षा शर्मांसारख्या गावातील व्यक्तीलाच गावातील दुसऱ्या व्यक्तींच्या गरजा समजू शकतात, असे आय.टी.सी.च्या अधिकाऱ्यांना वाटते.

ग्रामीण भागात कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करताना आय.टी.सी.ने दूरदृष्टीने विचार केला. त्याची फळे आता त्यांना मिळताहेत. सुरूवातीचे श्रम वाया न जाता केलेली गुंतवणूक दोन-तीन वर्षात भरून निघेल अशी आता आय.टी.सी.ला खात्री वाटते. याला दोन कारणे आहेत. एक म्हणजे, भारतीय वस्तू परदेशात विकून नफा मिळू शकतो आणि दुसरे म्हणजे, या दूरवरच्या भागातील ग्राहकवर्ग हा आता ग्राहकोपयोगी वस्तूंच्या बाबतीत आय.टी.सी.चाच असणार. आय.टी.सी.चे प्रयत्न पाहून दक्षिण कोरियातील एल.जी. इलेक्ट्रॉनिक्स, भारतातील दुचाकींमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेली टी.व्ही. एस. आणि भारत पेट्रोलियम या कंपन्यांनी आपापली उत्पादने विकण्यासाठी आय.टी.सी.बरोबर संपर्क साधला आहे.

हिन्दुस्थान लिव्हर, कॅस्ट्रॉल यासारख्या मोठ्या कंपन्याही आता ग्रामीण भागात असे प्रयत्न करीत आहेत. ■■

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर.)*

शेती

# सेंद्रिय शेती: आवाहन व आव्हाने

*(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या वतीने विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अलीकडेच २९ जून २००३ रोजी श्री. पी. बी. शितोळे यांचे 'सेंद्रिय शेती: आवाहन आणि आव्हाने' या विषयावर भाषण आयोजित करण्यात आले होते. या भाषणाचा व त्यावरील चर्चेचा गोषवारा येथे देत आहोत. - संपादक )*

पी. बी. शितोळे यांनी आपल्या `ग्रामपरिवर्तन' या संस्थेची, संस्थेच्या शेतीविषयक कार्याची व त्यामागील भूमिकेची थोडक्यात ओळख सुरूवातीला करून दिली. त्यानंतर त्यांनी भारतातील यापूर्वी घडून गेलेल्या आणि अनेक वर्षे ज्याचा बोलबाला होत आला आहे त्या `हरित क्रांती'चा मुख्य आशय स्पष्ट केला. संकरित बियाणे, रासायनिक खते, तण व कीटकनाशके, भरपूर पाणी, यांत्रिक मशागत, ऊर्जा व इंधनाचा मोठा वापर आणि या सगळ्यांसाठी लागणारे मोठ्या प्रमाणावरील स्थिर व खेळते भांडवल, यांमुळे ही हरित क्रांती घडून आली आणि उत्पादनाचे मान काही काळ वेगाने वाढत गेले ही वस्तुस्थिती, शितोळे यांनी प्रतिपादन केली. परंतु काही वर्षांनंतर सुपीक जमिनींचे खार जमिनीत होणारे रूपांतर, पाण्याचे प्रदूषण व त्यांतून उद्‌भवणारी पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि रासायनिक शेतीच्या उत्पादनाचे आरोग्यविषयक परिणाम यांकडे त्यांनी लक्ष वेधले. एवढेच नव्हे तर, जिथे हरितक्रांती मोठ्या प्रमाणावर झाली त्याठिकाणी अलीकडे अन्नधान्याचे उत्पादन घटत चालल्याचेही त्यांनी सांगितले. परिणामतः शेतकऱ्यांची खालावत चाललेली स्थिती व त्यामागची आर्थिक व सामाजिक कारणे यांचाही वेध यावेळी घेण्यात आला. या परिस्थितीवर मात करण्यासाठी, सेंद्रिय शेतीचे तंत्र सर्वसामान्य शेतकऱ्यांनी अवगत करण्याची गरजही त्यांनी प्रतिपादन केली.

श्री. शितोळे यांच्या भाषणाचा उत्तर भाग हा प्रामुख्याने सेंद्रिय शेतीच्या तात्विक व व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंवर भर देणारा होता. सूर्यप्रकाशाचा शास्त्रोक्त वापर, पाण्याचा तुलनेने कमी वापर, सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन, पिकांचा फेरपालट, मिश्र हिरवळींचे तसेच सेंद्रीय व गांडुळ खत, गोमूत्र, निंबअर्क फवारणी आणि भांडवलाचा मर्यादित वापर, अशा काही महत्त्वाच्या घटकांचा विचार, भाषणात,

सेंद्रिय शेतीचा पाया सांगताना करण्यात आला. तसेच त्यांनी, अनेक प्रयोगांतून सिद्ध झालेले असे सेंद्रिय शेतीचे अनेक फायदेही विशद केले.

सेंद्रिय शेतीचे प्रमुख फायदे असे की त्याने जमिनीचा काटकसरी वापर होऊन जमिनीची सुपीकता टिकवली जाते, वाढविली जाते. तसेच पाणी, जमीन आणि हवा हे मानवी जीवनाचे अत्यावश्यक घटक प्रदूषित होत नाहीत. भांडवलाचे प्रमाण अत्यल्प ठेवून रोजगारवाढीस चालना देणारी अशी ही शेती आहे. इतरही अनेक लहान-मोठ्याा फायद्यांचा उल्लेख करून शितोळे यांनी, या शेतीचे प्रत्यक्ष कार्यवाहीचे तंत्रही विशद केले. शितोळे यांनी, शेती व्यवसाय हाच मुळी स्वावलंबी आणि सातत्याने किफायतशीर राहण्यासाठी तसेच एकूण ग्रामीण विकासासाठी, भारतीय शेती, सेंद्रिय शेतीमध्ये परावर्तित होण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नाही, असे आपले मत ठासून मांडले.

व्याख्यानानंतर झालेल्या चर्चेमध्ये, श्री. शितोळे यांच्या सेंद्रिय शेतीबाबतच्या आग्रही मतावर अनेक आक्षेप घेण्यात आले. मुख्यतः हरितक्रांतीचे यशापयश आणि त्याने एकेकाळी भागविलेली भारताची भूक आणि आताची आलेली अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती यांकडे काही श्रोत्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. शितोळे यांच्या, हरितक्रांती प्रदेशातील अलीकडच्या उत्पादनघटीच्या मीमांसेवरही श्रोत्यांनी काही आक्षेप घेतले. श्रोत्यांच्या प्रश्नांना, शितोळे यांनी उत्तरेही दिली. चर्चेच्या ओघात असाही एक मुद्दा पुढे आला की, सेंद्रिय शेतीचे तंत्र म्हणजे रासायनिक निविष्टींच्या वापराचा पूर्णतः अभाव असण्याची कितपत आवश्यकता आहे ? दोन वेगवेगळ्या तंत्रांच्या योग्य मिलाप करून उत्पादनाची सातत्य-वाढ अंमलात येणार नाही का ? अतिशय गांभिर्याने आणि विविध नवनव्या मुद्यांच्या आधाराने ही चर्चा चांगलीच रंगली.

---

(पान २ वरून)

पाहावा. त्यात सविस्तर माहिती आहे. भाकड गायी पाळणे हे सुद्धा आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरू शकते. आपले अंक चांगले असतात. प्रसारासाठी शुभेच्छा !

ग. गो. फडके, दादर, मुंबई.

आपले द्वैमासिक हे मासिक झाल्याने फार आनंद झाला. आपण या मासिकाद्वारे अतिशय चांगली माहिती आम्हा विद्यार्थ्यांना पुरविता, त्याबद्दल धन्यवाद !

सुप्रिया पाटील, महावीर विद्यालय, कोल्हापूर



# शांततेच्या पाऊलखुणा

## फिरता प्रवासी रॉजर प्लंक



रॉजर प्लंक

संघर्ष किंवा द्वंद्व हा मानवी जीवनाचा नैसर्गिक आणि अविभाज्य घटक आहे. त्यातूनच माणसे आपले जीवन घडवीत जातात, स्वतःचा आणि इतरांचा विकास करीत जातात. जेव्हा संघर्ष संपतो तेव्हा शांततेची फळे चाखायला मिळतात. संघर्ष किंवा वैचारिक भिन्नता हे नैसर्गिक असले तरी त्यातून शारीरिक अथवा मानसिक हिंसा घडू नये हे महत्त्वाचे असते. दोन गटांमध्ये शांततेसाठी मध्यस्थी करणाऱ्या व्यक्तींनी संघर्षाचे मुद्दे सोडविण्यासाठी प्रयत्न करतानाच, दोन्ही गट हिंसक मार्गाकडे वळू नयेत, याचाही प्रयत्न करायचा असतो. वैयक्तिक किंवा समूहाचे रक्षण करण्यासाठी `बला'चा वापर केला तर तो एकवेळ समजून घेता येईल; तरीदेखील शांततेच्या प्रयत्नांमध्ये `बल' किंवा शक्तीप्रयोग याला स्थान नसते. `बल' हा शांततेचा पाया होऊ शकत नाही; तर आध्यात्मिकता, मानवता यांची शांतता स्थापन करण्यासाठी गरज आहे, ही भूमिका घेऊन जगभरात शांततेसाठी फिरणारा प्रवासी आहे रॉजर प्लंक.

रॉजर प्लंक (अमेरिका) स्वतः कायदेतज्ज्ञ आहेत. जॉर्ज वॉशिंग्टन लॉ स्कूल येथून उच्चशिक्षण घेऊन बाहेर पडलेले प्लंक शिक्षणानंतर लवकरच अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातील नोकरीत रुजू झाले. तेथे त्यांना लक्षात आले की शांततेचे प्रयत्न करण्याकडे आपला कल आहे, त्यांना तशी आवड होतीच. त्यांनी शांततेसाठी केलेल्या प्रयत्नांकडे एक नजर टाकली तर त्यांची या कामामागील तळमळ दिसून येते. मुख्य म्हणजे विविध देशांमध्ये फिरून हे सर्व प्रयत्न त्यांनी एकट्याने केले. त्यांच्यामागे ना सरकारी पाठबळ होते ना कोणती संघटना.

कोणत्याही देशातील प्रश्नाचा मागोवा घेताना, सामान्य माणसांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत सर्वांना गाठून त्यांची भूमिका समजावून घेऊन मग शांततेचा मार्ग सर्वांना सुचविण्याचा त्यांचा प्रयत्न वेगळा आहे.

त्यांच्यातील या नैसर्गिक व विशिष्ट असलेल्या क्षमतेचा उपयोग सर्वप्रथम दलाई लामा यांनी करून घेतला. जून १९९४ ते जानेवारी १९९६ या काळात, तिबेट प्रकरणी प्लंक यांनी दलाई लामा आणि चीनमधील वरिष्ठ अधिकारी यांच्यात चर्चा घडवून आणली. जुलै १९९५ ते जानेवारी १९९६ या काळात म्यानमारमधील लष्करी राजवट व लोकशाही समर्थक नेत्या आँग सॅन स्यू की यांच्यात चर्चा व्हावी यासाठी योजना आखली. जानेवारी १९९४ ते जून १९९४ या सहा महिन्यांत रॉजर प्लंक यांनी तिबेटमधील स्वायत्ततेसाठी व चीनची भूमिका समजून घेण्यासाठी दलाई लामा, तिबेटमधील राजकीय नेते सॅमधोंग रिंपोचे व चीनचे अधिकारी यांच्यासमवेत एक प्रस्ताव तयार केला. मानवाधिकार व कायदा यासंदर्भात मंगोलियाला काही मार्गदर्शन केले. अफगाणिस्तानमध्ये तालिबान राजवट असताना त्यांनी तेथे प्रत्यक्ष जाऊन अनेकांच्या भेटी घेऊन शांततेसाठी प्रयत्न केले. भारत-पाकिस्तान दरम्यान पन्नास वर्षांपासून धुमसत असलेल्या काश्मीर प्रश्नाचा अभ्यास करून त्यांनी भारताच्या पंतप्रधानांना एक योजना सादर केली आहे. इराकने कुवैतवर आक्रमण केल्यानंतर आखाती युद्धामुळे कुवेतमधील नागरिकांचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी देखील त्यांनी पाठपुरावा केला. पॅलेस्टाईन-इस्रायल प्रश्नाचा अभ्यास करून त्यांनी त्याबाबतही उपाय सुचविला आहे. या सर्व अनुभवांवरचे त्यांचे `द वॉन्डरिंग पीसमेकर' असे एक पुस्तकही अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे.

एका व्यक्तीचे, सामान्य माणसाचे शांततेसाठीचे हे प्रयत्न किती यशस्वी झाले असतील असा प्रश्न आपल्याला पडणे स्वाभाविकच आहे. या उत्सुकतेपोटी आणि त्यांची भूमिका समजावून घेण्यासाठी, अमेरिकेतील ओरॅकल मासिकाने त्यांची एक मुलाखत एप्रिल-जून २००१ च्या अंकात प्रसिद्ध केली आहे. त्यातील काही निवडक प्रश्नोत्तरे येथे संपादित करून दिली आहेत.

●परराष्ट्रविषयक किंवा राजकीय संबंधांमधील आध्यात्मिकतेचा आपण नेहमी उल्लेख करता. हे व्यवहारात शक्य होते का ? याबद्दल विस्ताराने सांगाल का ?

◆संघर्षाचे मुद्दे हे काळाशी संबंधित असतात, त्यात बदल होत असतात. मध्यस्थ म्हणून काम करीत असताना मी या बदलांना फक्त दिशा देण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करताना मी संबंधितांच्या नैतिक व आध्यात्मिक दृष्टिकोणाला प्राधान्य देतो. येथे राजकारणातील आध्यात्मिकतेचा मुद्दा पुढे येतो.

उदाहरणार्थ, तिबेट प्रकरणी चीनमधील नेत्यांशी चर्चा करताना मी त्यांच्याच संस्कृतीचा, विचारांचा उपयोग करून घेतला. ताओइझममध्ये राजकीय लवचिकता आहे तसेच कन्फ्युशियानिझममध्ये शिक्षणाच्या मदतीने शासनाचा कारभार सांभाळणे याला महत्त्व देण्यात आले आहे. हे मुद्दे जेव्हा मी त्यांच्यापुढे मांडले तेव्हा आध्यात्मिकता पुढे आली. अफगाणिस्तानमध्ये तालिबानच्या नेत्यांसमोर बोलताना मी इस्लाममध्ये संघर्ष सोडविण्यासाठी मोठी मंडळे वा समिती नेमली जाऊ शकते-हा मुद्दा मांडला. त्याचवेळी मी त्यांना हेही लक्षात आणून दिले की इस्लाममध्ये लोकप्रिय नेत्याला मान्यता आहे, याचाच अर्थ इस्लाम हा लोकशाही मानणारा धर्म आहे.

एवढेच नव्हे तर चर्चेच्या वेळी विविध व्यक्तींशी बोलतानाही व्यक्तींना मिळणारी शक्ती ही आध्यात्मिकतेच्या पायावर पुढे येत असते. राजकारण व आध्यात्मिकता यांचा संबंध नाही असे वरकरणी दिसत असले तरी ते तसे नाही. राजकारण हे आध्यात्मिक रणांगणच आहे; कारण आपल्या मूल्यांची, नैतिकतेची ती लढाई आहे. राजकारणात आपल्याला हिटलर व स्टॅलिन आठवतात पण महात्मा गांधी व नेल्सन मंडेला पटकन आठवत नाहीत.

भगवद्‌गीता, द लिजेंड ऑफ किंग आर्थर, द स्टार वॉर्स मुव्हीज या सर्वांमध्ये मानवी मूल्यांची, नैतिकतेची (म्हणजे आध्यात्मिकतेची) राजकीय पातळीवर दिसून येणारी लढाई दाखविली आहे.

●तुमच्या `द वॉन्डरिंग पीसमेकर' या पुस्तकात तुम्ही शासन आणि आध्यात्मिकता यांच्या संबंधाबद्दल काही म्हटले आहे. ते स्पष्ट करता येईल ?

◆धर्म आणि शासन यांची फारकत करून आपण धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राखले. पण याचा अर्थ शासन व आध्यात्मिकता यांचीही फारकत केली असा नव्हे. शासनाचा कारभार हा आध्यात्मिक पायावर आधारलेला आहे. मानवाधिकारांना, नैसर्गिक नियम अशी शासनाची साधारणपणे मान्यता असते. नैसर्गिक नियमांचे मूळ हे शेवटी परमेश्वरापर्यंत किंवा परमोच्च शक्तीपर्यंत जाऊन पोचते तेव्हा शासन हे नियम मान्य करून आध्यात्मिकतेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत असते. मानवाची सर्वंकष प्रगती हे शासनाचे ध्येय असते. आध्यात्मिक प्रगती ही देखील मानवाच्या सर्वंकष उन्नतीसाठीच असते. लोकशाही सर्वत्र रुजावी असे प्रयत्न करणे म्हणजे देखील आध्यात्मिकता मान्य करणे हे होय. नैतिक, सामाजिक मूल्ये जपणे हा राजकीय व आध्यात्मिक प्रक्रियेचा एक भाग आहे.

●तुमच्या सततच्या फिरण्यामुळे तुमचा वेगवेगळ्या संस्कृतींशी, विचारांशी आणि धर्मांशी संबंध आला. त्यातून तुम्हाला काय शिकायला मिळालं ?

◆तुम्ही कुठेही असलात तरी तुमची विचारांची दिशा, तुमची मनस्थिती ही मूलतः व्यापक हवी. भटकंतीचा उपयोग होतोच असे काही नाही. संकुचित दृष्टिकोण असला तर फिरूनही तुम्हाला काहीच शिकता येणार नाही. तसेच प्रत्येक संस्कृतीची, आध्यात्मिकतेची एक काळी बाजूही असते. स्वार्थासाठी, दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान करण्यासाठी आणि गर्वाने जेव्हा आध्यात्मिक शक्ती वापरली जाते तेव्हा तिचे समर्थन करणे शक्य नसते. पण मला एक जाणवते ते म्हणजे एक दिवस माणसे आपणहूनच परंपरांना आपल्या दिशेने नेतील. मानवतावादाची मूल्ये पसरविणारा समाज म्हणजे आध्यात्मिक समाज पुढे येईल.

●आपण शांततेसाठी करीत असलेल्या कामाचा काही उपयोग होतो असे तुम्हाला वाटते का ?

◆माझ्या कामाचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवर होऊन फार काही मोठी फलश्रुती होईल, अशी अपेक्षा मी करीत नाही. पण एक मात्र नक्की खरे की मी किमान शांततेचा वृक्ष हालविला आहे; इथे सावली आहे असा संदेश तरी मी जगाला देऊ शकलो. मला आणखी एक लक्षात आले. ते असे की, वादग्रस्त मुद्दे हे फक्त दोन वा तीन लोकांमध्ये नसतात. तर त्यासंबंधीच्या विविध गटांमध्येही असतात. वादग्रस्त मुद्यांचे एक मोठे जाळेच त्यामुळे तयार होते आणि त्यातून बाहेर पडणे एक महाकठीण कर्म होऊन बसते. अशावेळी अतिशय साध्या मार्गाचा-आध्यात्मिक मार्गाचाच अवलंब करणे सोपे जाते. विचारांच्या जुन्या पद्धती टाकून, तिरस्काराला प्रेमामध्ये बदलून, सहृदयता जागवून आणि लोकांमधील चांगुलपणा वर आणून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करता येतो.

●निराशादायक परिस्थितीतही हे काम आपण करावेच असे तुम्हाला का वाटते ?

◆माझ्या लहानपणी मी समुद्रावर खेळताना लाटा अडवायचो. ते कधीच मला जमले नाही आणि दमून मी तो नाद सोडून द्यायचो. त्या लाटा मात्र न थकता आपले नैसर्गिक काम पार पाडायच्या. त्या लाटांनी मला न थकता काम करण्याची शक्ती दिली असे मला वाटते. *(संदर्भ - इंटरनेट)* ■■

## जगाच्या पाठीवर..... अमेरिका-चीन संबंध

अमेरिका आणि चीन यांच्यातील संबंध हा आंतरराष्ट्रीय स्तरावर काळजीचा व औत्सुक्याचा विषय आहे. त्यामुळे अलीकडे (२२ मे २००३) अमेरिकेने चीनमधील या सरकारच्या अखत्यारीतील नोरिन्को कंपनीच्या उत्पादनांवर दोन वर्षासाठी बंदी घातल्याने उभयपक्षी संबंध ताणले जाणार किंवा कसे याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. नोरिन्को ही कंपनी चीनमधील सार्वजनिक क्षेत्रांतील एक मोठी कंपनी असून अमेरिकेला मोठ्याा प्रमाणावर निर्यात करण्यात ही कंपनी आघाडीवर आहे. सुमारे २० कोटी अमेरिकन डॉलर्स एवढी निर्यात ही कंपनी करते. या कंपनीच्या उत्पादनांमध्ये अनेकविध वस्तूंचा आणि तंत्रज्ञानाचा समावेश आहे. याशिवाय अभियांत्रिकीसंबंधित करार, गुंतवणूक यांतही या कंपनीला रस आहे. कंपनीने, इराणला क्षेपणास्त्रे दिली, असे अमेरिकेचे म्हणणे असून त्याची शिक्षा म्हणून उत्पादनांवर बंदीचा निर्णय घेण्यात आला, असे स्पष्टीकरण अमेरिकेने दिले आहे.

१९९० च्या दशकात अमेरिका-चीन संबंध आपापसातील आरोप-प्रत्यारोपांनी गाजले. अमेरिका नेहमीच दुटप्पीपणाने वागते असे चीनला वाटते; तर, चीन इतर देशांना लष्करी सहाय्य करीत असल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. त्यामुळे गेल्या दशकाचीच उजळणी या दशकात होणार की काय अशी चर्चा आहे. अमेरिकेच्या या बंदीच्या निर्णयावर चीनच्या परराष्ट्रखात्याने प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे की, "चीनमधील कंपनीने असे काही केल्याचे चौकशीत आढळले नसून अमेरिका आपली राजकीय धोरणे इत र देशांवर लादते आहे. उत्पादनांवरील बंदीचा हा निर्णय तर्काला धरून नाही." यानंतर मात्र उभय देशांनी यासंबंधी कोणतेच मतप्रदर्शन केले नाही. चीनमधील सरकारी प्रसारमाध्यमांनी या बंदीची दखलही घेतली नाही. या घटनेला महत्त्व न देण्याचे कारण अमेरिका-चीन यांच्यातील बदलते संबंध हे आहे, असे म्हटले जाते. अमेरिकेला दहशतवाद निपटून काढण्यासाठी चीनचे सहकार्य हवे आहे. चीनलाही जागतिक व्यापार संघटनेत प्रवेश करून आर्थिक फायदे मिळवायचे आहेत. एकाच कंपनीच्या नुकसानीचा विचार न करण्याचे चीनने ठरवले आहे. त्यामुळे सध्या हा विषय उभय देशांनी टाळला आहे. *(संदर्भ - एफ.ई.इ.आर.)*

## नद्या जोडण्याबाबत स्पेनमध्येही वाद

भारतात सध्या नद्या जोडण्याचा प्रकल्प विविध कारणांमुळे वादग्रस्त ठरतो आहे; स्पेनमध्येही असेच काहीसे घडते आहे. स्पेनच्या उत्तर भागातील एब्रो नदीचे पाणी दक्षिण भागातील कॅटालोनिया, व्हॅलेन्सिया, मर्सिया आणि अल्मेरिया यांकडे वळविण्याच्या प्रकल्पाला चांगलाच विरोध करण्यात येत आहे. 'युरोपियन एन्व्हार्यनमेंटल ब्युरो,' 'द वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर' आणि `स्पॅनिश प्रेशर ग्रुप इकॉलॉजिस्ट` यांनी म्हटले आहे की, या प्रकल्पामुळे सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय नुकसान होऊ शकते. आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ या संघटनांनी स्पेनमधील आधीच्या प्रकल्पाचे उदाहरण दिले आहे.

स्पेनच्या मध्य भागात यापूर्वी असाच एक म्हणजे टॅगूस-सेगुरा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे. यामुळे स्पेनच्या आग्नेय भागाला पाणी मिळावे अशी अपेक्षा होती. पण त्या भागातील पाण्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही, असे या संघटनांनी लक्षात आणून दिले आहे. त्यातच थोड्याफार प्रमाणात उपलब्ध झालेल्या पाण्यावर अनेकांचा डोळा असून पाण्याची मागणी वाढलेली आहे.

गोल्फ कोर्स व पर्यटनव्यवसाय मात्र या पाण्यावर वाढतो आहे. म्हणून येथील पाण्याचा प्रश्न आणखीनच चिघळला आहे. दरम्यान, या प्रकल्पासाठी स्पेनच्या सरकारने युरोपियन आयोगाकडे आर्थिक मदत मागितली आहे. पण यासंबंधीचा निर्णय अद्याप झालेला नाही.

*(संदर्भ - डाऊन टू अर्थ १५ जून २००३ )*

## १४०० वर्षांचे लॉर्ड चॅन्सेलरपद रद्द

आपल्यापैकी अनेकांना इंग्लंडचा इतिहास शाळेमध्ये शिकावा लागला आहे. राज्यशास्त्रात राज्यघटने विषयी शिकतानाही, इंग्लंडची लोकशाही राज्यव्यवस्था, अलिखित राज्यघटना, राजा (राणी)चे टिकून राहिलेले स्थान व हाउस ऑफ कॉमन्स आणि हाउस ऑफ लॉर्डस् यांविषयी आदरयुक्त ज्ञानप्राप्ती केली जाते. (निदान पूर्वी तरी केली जात होती !) इंग्लंडच्या लोकशाहीचा सुमारे पंधराशे वर्षांचा इतिहास ही आदरणीय बाब मानली जाते. आताचे इंग्लंडचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी मात्र धाडसाने, ब्रिटनच्या चौदाशे वर्षांपूर्वी सुरू झालेल्या `हाउस ऑफ लॉर्डस्'च्या न्यायालयीन उच्चाधिकारांवर अंकुश आणण्याचे ठरविले आहे. लॉर्ड चॅन्सेलर हे `हाऊस ऑफ

लॉर्डस् 'चे अध्यक्ष असतात आणि त्यांच्याकडे न्यायाधिशांची नेमणूक करण्याचा अधिकार असतो. तसेच अपिलांतील अगदी अखेरचे उच्च स्थानही त्यांच्यामध्ये केंद्रित झालेले असते. हे स्थानच आता रद्दबातल करण्यात येऊन त्याच्या जागी, संसदेच्या या उच्च गृहात, सभापतींची नेमणूक करण्यात येणार आहे. सभापतींचे स्थान हे निव्वळ राजकीय स्थान असणार आहे आणि त्यांना न्यायमंडळाचे कोणतेही अधिकार असणार नाहीत.

लोकशाहीत सामान्यतः कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांची फारकत केलेली असते; परंतु इंग्लंड हे कदाचित असे एकमेव राष्ट्र आहे की जेथे कॅबिनेट मंत्री (लॉर्ड चॅन्सेलर) हे न्यायमंडळाच्या प्रमुखपदी आहेत. आता नव्या व्यवस्थेत मात्र, न्यायाधीशांच्या नेमणुकांसाठी एक वेगळी समिती - ज्युडिशियल अपॉईंटमेंटस् कमिशन - स्थापन करण्यात येणार आहे; आणि लॉर्ड चॅन्सेलरचे पदच रद्द होणार आहे. या पदाचा इतिहास खूप मोठा आहे. पहिले लॉर्ड चॅन्सेलर नेमले गेले ते इ.स. ६०५ मध्ये. त्यावेळी अगदी पंतप्रधानपदही अस्तित्वात नव्हते. त्यानंतर जवळजवळ आठशे वर्षे म्हणजे १४व्या शतकापर्यंत या पदावर प्रामुख्याने धर्मगुरूची (प्रीस्टची) नेमणूक केली जात असे. त्याच्याकडे अगदी राजघराण्याचे हिशोब व पत्रव्यवहार ठेवण्यापर्यंत अनेक कामे असत. आत्ताचे लॉर्ड चॅन्सेलर, लॉर्ड आयर्विन हे आता निवृत्त होत आहेत; आणि ही संधी साधूनच हा इतिहास बदलणारा क्रांतिकारक निर्णय पंतप्रधानांनी घेतला आहे.

अर्थातच, या निर्णयाविरुद्ध आरडाओरड अपेक्षितच होती. टोरी पक्षाने या निर्णयाविरुद्ध आगपाखड केली आहे. या पक्षाचे एक नेते पीअर यांनी म्हटले आहे की, "गेल्या तीस वर्षात मी, इतका कधीच संतापलो नव्हतो. " त्यातच भरीस भर अशी की नव्याने निर्माण होणाऱ्या सभापतीपदावर पंतप्रधान ब्लेअर यांनी, आपले मित्र लॉर्ड फलकोनर यांची नेमणूक केली आहे. ही नेमणूकही वादग्रस्त ठरली आहे. अर्थात, सरकारी पक्षाने, कायदेमंडळाचे स्वतंत्र अस्तित्व असणे ही चांगल्या लोकशाहीसाठी आवश्यक प्रथा असल्याचे सांगून या आपल्या निर्णयाचे समर्थन केले आहे. काही असो, पण निवृत्त होऊघातलेले लॉर्ड चॅन्सेलर लॉर्ड आयर्विन हे मात्र `शेवटचे' लॉर्ड चॅन्सेलर म्हणून आणि लॉर्ड फलकोनर हे पहिले `सेक्रेटरी ऑफ स्टेट ऑफ कॉन्स्टिट्यूशनल अफेअर्स' म्हणून ब्रिटनच्या इतिहासात नोंदले जातील हे मात्र खरे ! ■■


*(संदर्भ - द हिंदू )*

## भारतातील वाढता तरूण ग्राहकवर्ग

भारतातील चंगळवाद वाढतो आहे किंवा भारतातील नागरिकांचा ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करण्याकडे कल वाढतो आहे, असे सामान्यतः म्हटले जाते. पण असे घडण्यामागे, अनेक कारणांमागील एक महत्त्वाचे कारण, या देशातील संख्येने वाढत असलेला तरूणवर्ग हे आहे. सध्या ६२ टक्के भारतीय नागरिक हे, १४ ते ६४ या वयोगटातील आहेत. या वयोगटातील व्यक्ती विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी करण्यास उत्सुक असतात. त्यामुळे भारतातील ग्राहकवर्ग हा मोठा समजला जातो.

इ.स. २००० ते इ.स. २०१५ या काळात भारतातील लोकसंख्येचा वाढीचा दर हा आशियातील इतर देशांच्या तुलनेने कमी असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला असला तरी आजमितीस भारत हा शंभर कोटींवर लोकसंख्येचा देश आहे. आशियातील विविध देशांच्या लोकसंख्यावाढीचा दर वर उल्लेखित कालावधीत कसा असेल, हे खालील आलेखात मांडण्यात आले आहे.

इ.स. २००० ते २०१५ या काळातील लोकसंख्या वाढीचा दर (अंदाजे)




*(संदर्भ - द वर्ल्ड बँक २००३ डिव्हलपमेंट इंडिकेटर्स, इकॉनॉमिक टाइम्स)*

■■

## ज्येष्ठ नागरिकांच्या संख्येतही भारत आघाडीवर

भारतातील ज्येष्ठ नागरिकांची (६५ वर्षांवरील नागरिक) संख्या सुमारे ४ कोटी ८० लाख एवढी असून ज्येष्ठांच्या लोकसंख्येत, आशियात भारताचा दुसरा क्रमांक आहे. मात्र एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ज्येष्ठ नागरिकांच्या टक्केवारीचा विचार केला तर भारत पिछाडीवर आहे. याचे कारण म्हणजे भारतातील सरासरी आयुष्यमान ६१.९ आहे. आशियातील इतर देशांमध्ये मात्र ते ६६.५ एवढे आहे. खालील आकडेवारीवरून हे स्पष्ट होईल.

| देश | ज्येष्ठ नागरिकांची संख्या (दशलक्ष) | एकूण लोकसंख्येतील टक्केवारी |
|---|---|---|
| चीन | ९०.६ | ७.१ |
| भारत | ४८.१ | ४.७ |
| जपान | २२.२ | १७.५ |
| इंडोनेशिया | १०.६ | ४.६ |
| दक्षिण कोरिया | ३.५ | ७.३ |
| आशिया | २०३.७ | ६.२ |

*(संदर्भ - फ्रॉस्ट अँड सलिव्हान , इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

## संस्थेची इतर प्रकाशने

(१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) गव्हर्नन्स, सुपरव्हिजन अँड मार्केट डिसिप्लिन : लेसन्स फ्रॉम एन्रॉन (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयंत वर्मा (किंमत शंभर रुपये)

## अमेरिका आणि आशियाई देश बुद्ध्यांक की प्रयत्न ?

अमेरिकेच्या सर्वंकष प्रगतीत आशियातील नागरिकांचा फार मोठा वाटा आहे. अमेरिकेतील नागरिकांना आपल्या देशाच्या प्रगतीसाठी दुसऱ्या देशांतील नागरिकांची मदत का बरे घ्यावी लागली ? अमेरिकेत आजही महाविद्यालयीन शिक्षणात आशियातील विद्यार्थीच पुढे आहेत. अमेरिकेतील विद्यार्थी मागे का पडले ? सध्याच्या प्रचलित भाषेत बोलायचे तर आशियातील विद्यार्थ्यांचा, नागरिकांचा बुद्ध्यांक जास्त आहे का ? की त्यांच्या संस्कृतीमधून झालेली त्यांची जडण-घडण यासाठी कारणीभूत आहे ?

या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न झाला; तेव्हा अभ्यासकांना असे आढळले की, अमेरिकेची बुद्ध्यांक मोजून त्यानुसार अतिहुषार, हुषार, सामान्य, ढ अशी वर्गवारी करण्याची नि त्याआधारे बालकांचे मूल्यमापन करण्याची पद्धतच धोक्याची आहे. एकदा बुद्ध्यांक मोजला की मुलांची, पालकांची, शिक्षकांची आणि समाजाची अशी धारणा बनते की विशिष्ट व्यक्ती विशिष्ट गटातीलच आहे, नि ती त्याच स्तरावर राहणार, यामुळे स्वकष्टाने व्यक्ती आपली प्रगती घडवून आणू शकते, असे त्यांना वाटत नाही. आणि येथेच नेमके, आशियातील मुले व नागरिक बाजी मारतात. आशियातील संस्कृती ही माणसाला प्रयत्न करण्यासाठी उद्युक्त करते, ती जिद्द, मेहनत आणि चिकाटी हे गुण आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहन देते. त्यामुळे एखादी गोष्ट या प्रयत्नांच्या मार्गाने आपल्याला मिळू शकते, असा विश्वास व आशा माणसाच्या मनात निर्माण होते. मग तो अथक प्रयत्नांनी ती गोष्ट मिळविण्याची धडपड करतो. नैसर्गिक बुद्धिमत्तेपेक्षा, बौद्धिक श्रमाला प्राधान्य देण्याचे हे साधे तत्त्वज्ञान आशियातील नागरिकांना व्यक्तीगत प्रगती करण्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे. (मानवाची बौद्धिक प्रगती सभोवतालच्या वातावरणातून होऊ शकते असे जनुकशास्त्रीय संशोधनातून पुढे आले आहेच.) याउलट, अमेरिकेत, एकदा तुमची बुद्धिमत्तेची पातळी निश्चित झाली की त्यापेक्षा जास्त अपेक्षा विद्यार्थ्यांकडून करणे ही शिक्षकांसाठी क्रूर वागणूक ठरते. मग ते शिक्षक व तो विद्यार्थी काय प्रयत्न करणार ? तसेच यामुळे व्यक्तीच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो आणि मानसिक धैर्यही खालावते. अमेरिकेच्या शिक्षणव्यवस्थेत सर्वजण बुद्धिमत्तेविषयी बोलतात पण मेहनत, प्रयत्न, जिद्द यांचा उल्लेख कोणीच करीत नाही. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांचे व नागरिकांचे व्यक्तिगत प्रयत्न एका मर्यादेला संपतात. आशियातील विद्यार्थी मात्र अथक प्रयत्नांनी अनेक क्षेत्रांत बाजी मारताहेत. *(संदर्भ - इंटरनेट )*

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•अजित कर्णिक •विकासचंद्र चित्रे •मृणाल दत्तचौधरी •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •रमेश पानसे •आनंद नाडकर्णी
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**